हाकारा

वर्ष अठरावे : अंक पहिला - दुसरा
जानेवारी - जून १९९७

वारली लोकगीते व बोलीभाषा विशेषांक



महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

स्फूर्तिस्थान / प्रेरणा : *कै. प्रा. गं. बा. सरदार*

कार्यकारी मंडळ

उपाध्यक्ष	:	प्रा. व्ही. जी. पेंढारकर
मुख्य सचिव	:	प्रा. रा. के. मुटाटकर
सह सचिव	:	श्री. पुरुषोत्तम आगाशे
खजिनदार	:	डॉ. व्ही. एस. कुलकर्णी
सभासद	:	डॉ. एन. एस. देवधर
	:	डॉ. बी. व्ही. भानू
	:	डॉ. मिलिंद बोकील
	:	डॉ. एस. जी. देवगावकर
	:	ॲड. पद्माकर वळवी
	:	श्रीमती आरती कौलगेकर

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

हाकारा

अनुक्रमणिका

या अंकाविषयी	३
लेखकाचा परिचय	४
प्रास्ताविक विवेचन	५
विभाग १ : देव, धर्म, जन्ममृत्यू विषयक गीते	
१. नमन (१)	१०
२. नमनाचे गाणे	११
३. देवांना आवाहन	१२
४. नमन (२)	१३
५. नमन (३)	१४
६. देवांच्या वस्तीचे गाणे	१४
७. नारनदेवाचे गाणे	१४
८. नारन देव (१)	१५
९. नारन देव (२)	१६
१०. सभा	१६
११. नारन देव (३)	१७
१२. देवसभा	१७
१३. चांदणे	१८
१४. जत्रा	१८
१५. जन्म मरण	१९
१६. मृत्यू (१)	२०
१७. मृत्यू (२)	२४
१८. शोकगीत	२४
विभाग २ : विवाह व प्रेमविषयक गीते	
१९. वधूपरिक्षा	२५
२०. घर	२५
२१. मंडप	२६
२२. हिंदोळ्याचे गाणे	२६
२३. वस्त्रालंकार	२७
२४. कंकण	२७
२५. दागिन्यांचे गाणे	२८
२६. हळद	२८
२७. विवाह गीत (१)	२९
२८ विवाह गीत (२)	३१

वर्ष अठरावे : अंक -पहिला व दुसरा
जानेवारी - जून १९९७

मूल्य रू. २५/-

पत्रव्यवहाराचा पत्ता
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३८७२१९

संपादक
रामचंद्र मुटाटकर

कार्यकारी संपादक
मुखपृष्ठ व सजावट
पुरुषोत्तम आगाशे

अक्षरजुळणी
असाईन सिस्टीम्स्
दत्तवाडी, पुणे ३०.

प्रकाशक
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
ज्ञान प्रबोधिनी मुद्रण विभाग
५१०, सदाशिव पेठ, पुणे ३०.
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले

अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

अनुक्रमणिका

२९. जावय सुनस ३१

३०. कांडण ३२

३१. उंबरचे गाणे ३२

३२. लग्न ३३

३३. गादी ३३

३४. तुझी बायकु ३४

३५. नईचे कासाल ३४

३६. चल जाव..... ३५

३७. प्रित ३५

विभाग ३ :
शेतीविषयक गीते

३८. कुंपण ३६

३९. पाऊस ३६

४०. पाऊस धारा ३७

४१. वनसय (१) ३७

४२. वालाचे गाणे ३८

४३. रहाटाचे गाणे ३८

४४. कुऱ्हाडीचे गाणे ३९

४५. रामजी भंडारी ३९

४६. खळ्यावरील गाणे ४०

४७. कामकरी बायकांचे गाणे ४२

विभाग ४ :
इतर गीते

४८. अंगाईगीत ४३

४९. सर्पाची मुलगी ४४

५०. मोती ४४

५१. परिमल ४५

५२. पाखराचे गाणे ४५

५३. कोकत्री ४६

५४. वनसय (२) ४६

५५. नाच ४७

५६. दिवा ४७

५७. गवारी ४८

५८. गजरा ४८

५९. बाजार ४८

६०. चोरी ४९

६१. तमासा ४९

६२. गरदी ५०

वारली जमात **५१**

वारली लोकांची भाषा **५२**

नात्याचे शब्द **५२**

वारली देवांची नावे **५४**

सण व धार्मिक दिवस **५५**

धार्मिक विधी **५५**

स्त्री पुरूषांची नावे **५६**

काही म्हणी **५६**

वारली शब्द **५७**

[illegible] ६१

॥ ऋणनिर्देश ॥

या अंकासाठी पी. एच्. डी. प्रबंधाचे मूळ हस्तलिखित श्री. अविनाश रानडे यांनी उपलब्ध करून दिले तसेच पुणे विद्यापीठातील जयकर ग्रंथालयातील ग्रंथपालांनी प्रबंधाची मूळ प्रत उपलब्ध करून दिली त्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

या अंकाविषयी....

हाकाराचा हा विशेषांक वाचकांच्या हाती देताना अत्यंत आनंद होत आहे. प्रस्तुत अंकामध्ये वारली लोकगीते व तदनुषंगाने भाषाशास्त्रदृष्ट्या बोलीभाषेचा अभ्यास हा विषय हाताळण्यात आला आहे.

भाषा आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत. भाषेचा अभ्यास करत असताना संस्कृतीचे ज्ञान मिळते. एखाद्या बोलीभाषेतील शब्दांवरून त्या संस्कृतीचे अन्य कुठल्या संस्कृतीशी संबंध आहेत तसेच ती संस्कृती किती पुरातन आहे. याचीही कल्पना येते.

जितकी संस्कृती जुनी असते तेवढे लोकवाङ्मय - लोकगीते, लोककथा अधिक समृद्ध असते.

भाषेस लिपी नसल्यास अगर समाज अशिक्षित असेल तर अशा संस्कृतीमध्ये मौखिक साहित्य जास्त प्रमाणात आढळून येते. अशा वेळेस संस्कृतीबद्दलचे ज्ञान मौखिक परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे दिले जाते.

डॉ. ज. के. रानडे यांनी प्रख्यात साहित्य समीक्षक प्रा. रा. श्री. जोग यांच्या मार्गदर्शनाखाली हस्तलिखित पी. एच्. डी. प्रबंध १९५७ साली लिहिला.

ध्वनिमुद्रणाची कुठलीही सोय नसताना लोकगीतांचे संकलन करणे ही खरोखरच कठीण बाब आहे. ही लोकगीते गोळा करताना कुठल्या कुठल्या अडचणी आल्या ते प्रास्ताविक विवेचनात सांगितले आहे.

लोकगीतांच्या आरशामध्ये संस्कृतीचे प्रतिबिंब पहायला मिळते. त्यातल्या त्यात देवधर्मविषयक तसेच स्त्रीविषयक संस्कृतीचे जास्त दर्शन घडते.

वारली. उत्तर कोकण किनारपट्टीवरील एक आदिवासी जमात. गोदूताई परूळेकरांनी त्यांचे संघटन केले व जमीनदारीविरूद्ध बंड पुकारले आणि त्यामुळेच जगाला वारली जमात माहित पडली. 'जेव्हा माणूस जागा होतो' या त्यांच्या पुस्तकास साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला.

त्यानंतर वारली जीवनावर कथा, कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. आता तर वारली चित्रकला परदेशी जाऊन पोहोचली आहे. वारली साम्यवादी झाल्यावर काही नवी लोकगीते, कथा तयार झाल्या असतील, त्याचेही असेच विश्लेषण व्हावयास हवे.

आदिवासी साहित्याचा अभ्यास याचा एक धडा श्री. ज. के. रानडे यांनी घालून दिला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रातील इतर आदिवासी साहित्याचाही अभ्यास होणे जरूरीचे आहे. मराठी साहित्यात यास मोठी संधी आहे.

हा अंक भाषाशास्त्र तसेच सामाजिक शास्त्रांच्या अभ्यासकांना मार्गदर्शन व सर्वसामान्यांना माहितीपूर्ण ठरणारा आहे. आपल्या प्रतिक्रिया जरूर कळवाव्यात.

- संपादक

लेखकाचा परिचय

डॉ. ज. के. रानडे

जन्म : ४ फेब्रुवारी [redacted] १९०८ मृत्यु : [redacted] ८ डिसेंबर १९७८

■ **शिक्षण :**

एम. ए. बी. एड., सर्व शिक्षण सांगली येथे झाले.

"वारली लोकगीते व बोलीभाषा'' या विषयावर १९५८ साली पुणे विद्यापीठातून पी. एच. डी. पदवी मिळाली. या प्रबंधासाठी प्रा. रा. श्री. जोग यांचे मार्गदर्शन लाभले.

■ **व्यवसाय :**

१९४२ - १९४६ : शिक्षक म्हणून सातारा, सावनेर, उंबरगाव येथे काम पाहिले.

१९४६ - १९६४ : पुणे येथील फर्ग्युसन महाविद्यालयात मराठीचे प्राध्यापक म्हणून काम पहायला सुरवात केली. नंतर काही काळ कीर्ती महाविद्यालय, मुंबई येथेही काम केले.

१९६४ - १९६९ : विलिंग्डन महाविद्यालय, सांगली येथे मराठी विभागाचे प्रमुख म्हणून पदभार सांभाळला.

१९६९ : निवृत्त झाल्यानंतर सांगलीतच वास्तव्य होते.

■ **साहित्य**

महाविद्यालयातून शिकवत असताना स्त्री, किर्लोस्कर, मनोहर, वसंत, भालचंद्र इ. मासिकातून कथा, लघुनिबंध वगैरेचे लेखन केले. काही पुरस्कारप्राप्त कथाही त्यात आहेत.

प्रास्ताविक विवेचन

प्रस्तुत प्रबंधाचा विषय प्राधान्याने वारली लोकगीतांचा व तदनुषंगाने वारली बोलीचा अभ्यास हा आहे. वारली लोक व त्यांचे जमीन मालक यांमध्ये अलिकडच्या काळांत मोठाच संघर्ष चाललेला आहे हे आपण वर्तमानपत्रांत वाचतों; त्यामुळे त्या जमातीविषयी एक निराळे औत्सुक्यही उत्पन्न झालेलें आहे.

वारली लोकांची आर्थिक व सामाजिक स्थिती कशी आहे यासंबंधीचे विवेचन श्री. के. जे. सावे यांनी १९४५ साली प्रसिद्ध केलेल्या 'वारली लोक' (The Warlis) या पुस्तकांत पाहावयास मिळतें. १९५१ साली प्रसिद्ध झालेल्या श्री. वा. ब. कर्णिक यांच्या 'वाडगीण' या कादंबरीत वारली जीवनाची थोडीशी ओळख होते. श्री. वि. वा. हडप यांच्या 'गोदाराणी' व श्री. प. त्रिं . सहस्त्रबुद्धे यांच्या 'पहिली लाट' या कादंबऱ्यात वारली जीवन रंगविलेलें आहे. आचार्य भिसे यांनी लिहिलेल्या 'जंगलातील छाया' या पुस्तकांत आणि श्री. वसंतराव नारगोळकर यांनी लिहिलेल्या 'जंगलचे राजे' या ग्रंथातही आदिवासी जीवनाचें जे चित्रण केले आहे त्याच्या सहाय्याने वारली लोकांविषयी माहिती मिळते. वरील सर्व ग्रंथात जमातीची आर्थिक व सामाजिक परिस्थितीच प्रामुख्याने वर्णन केलेली आहे व त्या अनुषंगाने वारली बोलींत लिहिलेले काही उल्लेख आलेले असल्यामुळे वारली बोलीचे स्वरूप कळण्यास थोडीशी मदत होते. परंतु ते उल्लेख करतांना लेखकाचे लक्ष भाषेच्या काटेकोरपणापेक्षा वारली जीवनाकडे असल्याने, त्या ग्रंथाचा उपयोग वारली बोली जाणण्यासाठी करणे योग्य होणार नाही.

अधिकृत ग्रंथ म्हणजे 'हिंदुस्थानचा वंशशास्त्र विषयक अभ्यास' (Ethnology Of India) हा ग्रंथ सन १८५८ मध्ये प्रसिद्ध झाला व त्यांत असे म्हटले आहे की ''वारली लोकांची नावे मराठी आहेत व ते मराठी भाषा बोलतात'' ("The Warlis have Marathi names and speak Marathi language" "Ethnology of India" by Latham P. 347)

त्याचप्रमाणे दुसरा अधिकृत ग्रंथ म्हणजे 'बाँबे गॅझेटिअर' हा होय. त्यांत पुढील विधान आहे. ''वारली लोकांची भाषा कुणबी लोकांच्या भाषेसारखीच आहे. ते नेहमी मराठी भाषा बोलतात; फक्त उत्तरेकडचे वारली लोक तेवढे गुजराती भाषा बोलतात.'' ("The speech of the Warlis differ little from that of the Kunbis. They always speak Marathi, except those in the extreme north, who speak Gujarati." - Bombay Gazetteer Vol. XIII Part I P. 183)

वारली बोलीविषयी निश्चित व सविस्तर विवेचन ज्यात केले आहे असा ग्रंथ म्हणजे सर जॉर्ज ग्रिअर्सन यांनी संपादित केलेला 'भारताची भाषिक पाहणी' (Linguistic Survey of India) हा होय. या ग्रंथाच्या सातव्या खंडात पान १४१ वर वारली बोलीबद्दल पुढील विधान आहे -

''ठाणे जिल्ह्यातील वारली हे सुद्धा भिल्ल आहेत व त्यांची पहिली बोली इतर भिल्ल आणि खानदेशी बोलीसारखीच असली पाहिजे. कालान्तराने त्या बोलीवर मराठीचा इतका परिणाम झालेला आहे की आता ती बोली म्हणजे ठाण्याचा अंतिम उत्तर भाग सोडून, मराठीचीच पोटभाषा म्हणावी लागेल. अंतिम उत्तरेकडे मात्र ती गुजरातीची पोटभाषा आहे.'' ("The Warlis of Thana are also Bhils and their language must orginally have been of the same kind as other Bhil dialects and Khandesi. In the course of time, it has, however, been so largely influenced by Marathi, that it must now be classed as a dialect of that language except in the extreme north, where it is stated to be a form of Gujarati" - Linguistic Survey Of India by Dr. Grierson, Vol. VII P. 141)

वारली बोलीचे स्वरूप लक्षात येण्यासाठी सर ग्रिअर्सन यांनी एक उतारा दिला आहे. हा उतारा ज्या व्यक्तींकडून वदविला आहे ती व्यक्ती ठाणे जिल्ह्याच्या कोणत्या विभागात राहाणारी आहे यासंबंधीचा उल्लेख असता, तर बोली

उत्तरेकडची की दक्षिणेकडची हे सांगता आले असते. या उताऱ्यासंबंधी जो शब्दप्रयोग केलेला आहे तो पुढील प्रमाणे :- "The specimen received from Thana corroborates these statements."

''ठाण्याहून घेतलेला उतारा'' याचा अर्थ खुद्द ठाणें गावांत असा घेतला तर 'ठाणे' जिल्ह्यांत 'ठाणे' हे गांव जवळ जवळ अंतिम दक्षिणेकडे आहे असे दिसते. तसा अर्थ नसेल तर ठाणे जिल्ह्यांतील सर्वसाधारण वारली बोलीचा तो उतारा आहे असें समजणें जरूर आहे.

वारली बोलीसंबंधी पंडित ग्रिअर्सन यांनी जो निष्कर्ष काढला तो पुढीलप्रमाणे :

''वारली बोलीच्या उताऱ्यांतील भाषा म्हणजे मिश्र भाषेचा एक प्रकार आहे. ठाण्यांत जी भाषा प्रचलित आहे तिच्याशी ती बव्हंशीं जुळते. बाकीच्या बाबतीत तिचे पुण्याच्या मराठीशी साम्य आहे; आणि शेवटी असे म्हटले पाहिजे की तींत गुजराती मिसळलेली आहे.''

("The language of the specimen is a mixed form of speech. In most respects it agrees with the current language of Thana, other characteristics it shares with the Marathi of Poona, and lastly there is an admixture of Gujarati" - Linguistrc Survey of India by G.A. Grierson Vol. VII P. 141)

बहुसंख्य वारली ज्या विभागांत राहतात त्याच भागांतील वारली व्यक्तीकडून हा उतारा घेणे निर्णायक मत देण्याच्या दृष्टीने अधिक योग्य म्हटले पाहिजे. वारली कोणत्या भागात प्रामुख्याने स्थायिक झाले आहेत हे सांगताना सर ग्रिअर्सन यांनी पुढील विधान केले आहे.

''वारली लोक ठाण्यामध्ये पहिल्या आदिवासी जमातीपैकी आहेत. त्या ठिकाणी त्यांची संख्या ८९,००० इतकी आहे. त्यांच्यापैकी अर्ध्याहून अधिक संख्या डहाणूच्या ईशान्येकडे राहात असून तोच भाग त्यांच्या वस्तीचा गाभा आहे.''

("The Warlis are one of the early tribes in Thana where they are estimated at 89,000 individuals. Their headquarters are in the north-west in Dahanu, where they form more than half of the population." -"Linguistic Survey of India" by Dr. G. A. Griesoon Vol. VII P. 141)

वारली लोक ठाण्याच्या उत्तरेकडेच बहुसंख्येने राहतात. त्यामुळे त्या भागांतील लोकांची गीते अधिक प्रमाणात या प्रबंधात घेतली आहेत.

वारली लोकांचे लिखित वाङ्मय वारली गीतांतच मिळतें, त्याचा उपयोग करणें आवश्यक आहे. मात्र लोकगीतातील भाषेचे स्वरूप आजच्या वारली बोलीशी सर्वस्वी जुळणारे असेल असे नाही. लोकगीताचा निश्चित काल ठरविणे हेही शक्य नाही, ती गीते जुनी असली तरी त्यांची भाषा लोकांच्या म्हणण्यात अर्वाचीन होण्याचा संभव असतो. शिवाय त्यांत कांही गीते तर अलीकडची आहेत हे त्यांतील मजकुरावरून स्पष्ट दिसते.

वारली लोकगीते जमविणे हे अत्यंत कठिण काम आहे. वारली हे विशेषत: डोंगराळ भागात राहणारे आहेत. तालुक्यात जी लहान लहान खेडी असतात त्यापासूनही हे लोक दूर राहतात. ज्या ठिकाणी ते शेती करितात, त्या जवळच त्यांच्या दहा वीस झोपड्या एकत्र अशा दिसतात. जमीन मालकाच्या शेतात खपून जे मिळेल त्यावर ते उदरनिर्वाह करतात. त्यामुळे त्यांची वस्ती एखाद्या शेतावरच असते.

मुद्दाम वेळ खर्चून अशा ठिकाणी गीतें जमविण्यासाठी आपण गेलों, तरी दिवसभर ते लोक निरनिराळ्या शेतीच्या कामात गुंतलेले असतात; त्यांची गाठ पडणे अशक्य असते. सूर्योदयाबरोबर त्यांना शेतीच्या कामाला जावे लागते. मध्यंतरी दोन प्रहरी त्यांना विश्रांती मिळाली तरी, त्यावेळी त्यांना एकत्र आणून त्यांच्याकडून गाणी म्हणवून घेणे शक्य नसते; म्हणून त्या डोंगराळ मुलुखात रात्री मुक्काम करून त्यांच्याकडून गाणी म्हणवून घेणे जरूर असते.

एवढ्यानेही काम भागत नाही. एखाद्या ठिकाणी जरी मुक्काम केला तरी त्या ठिकाणी ज्या काही झोपड्या असतील त्यांतील वारली एकत्र येऊं शकतात. एखादा जमीनमालक किंवा स..कारी अधिकारी यांच्यातर्फे आपण मुक्काम करण्याचे

ठरविलें, तर आसपासच्या दोन चार मैलातील वारली एकत्र आणता येतात व आपले काम होण्याची शक्यता अधिक असते.

आजच्या काळातील आणखी एक मोठी अडचण म्हणजे ठाणे जिल्ह्यातील वारली व त्यांचे जमीनमालक यांचे संबंध पूर्वीसारखे राहिलेले नाहीत; त्यामुळे कोणत्याही जमीनमालकाच्या आज्ञेने हे वारली एकत्र येतीलच अशी आजची स्थिती नाही. अर्थात् ज्या जमीनमालकाचे संबंध वारली कुळाशी चांगले आहेत असा मालकच याबाबतीत उपयोगी पडतो.

सरकारी अधिकारी सत्तेच्या जोरावर हे काम अधिक सुलभतेने करू शकतो; परंतु त्याच्या कामाच्या व्यापात त्याची उपस्थिती मिळणे काही वेळा मुष्किलीचे असते; म्हणून काही वेळा योग्य असा जमीनमालक व काही वेळा सरकारी अधिकारी या उभयतांची मदत घ्यावी लागते.

पूर्वयोजना न करिता आपण एखाद्या ठिकाणीं जाऊ, बहुसंख्य वारली उपस्थित होतील असेंही नाही. वारल्यांप्रमाणे शेतीचे काम करणाऱ्या ज्या इतर जमाती आहेत त्यांत कोळी, कातकरी, दुबळा, धोडी आणि कोंकणे इत्यादि नऊ जमातींचा अंतर्भाव होतो. बाँबे गॅझेटिअरमध्ये पुढील विधान आहे.

''१८७२ च्या शिरगणतीप्रमाणे ठाणे जिल्ह्यातील लोकसंख्या पाहतां नऊ आदिवासी जमातींचा तींत अंतर्भाव होतो. त्यांची लोकसंख्या ३,८०,००० असून एकूण लोकसंख्येच्या मानाने ते शेकडा ४५ टक्के आहेत. त्याचा लोकसंख्येच्या दृष्टीने क्रम लावल्यास आग्री, कोळी, वारली, ठाकूर, कातकरी, दुबळा, वैती, कोकणे आणि धोडी असा लागतो.

("According to 1872 Census, the early population of the District included 9 tribes with a total strength of nearly 3,80,000 souls or 45% of the total population. These were in order of strength, Agris, Kolis, Warlis, Thakurs, Katkaris, Dublas, Vaitis, Konkanas and Dhodias." - Bombay Gazetteer, Thana Vol. XIII, Part I P. 60)

इतर जमातींची बोली व गाणी यात व वारली बोलीत भिन्नता असणे क्रमप्राप्तच आहे; म्हणून ज्या ठिकाणी जावयाचे त्या ठिकाणी आजूबाजूचे वारलीच एकत्र येतील अशी खबरदारी घ्यावी लागते. त्यांना एकत्र आणण्याकरिता निरोप देऊन अमुक ठिकाणी रात्रीच्या वेळी सर्वांनी जमावे अशी व्यवस्था करावी लागते. शहरी माणसाला ज्या ठिकाणी दिव्याशिवाय चालणे अशक्य अशा त्या प्रदेशांत रात्रीच्या अंधःकारांत दोन तीन मैल अंतरावरून हे वारली आले त्यामुळेच गीते जमविण्याचे काम मी करू शकलो.

केवळ वारली पुरूष एकत्र येऊन चालण्याजोगे नसते. वारली स्त्रियासुद्धा गाणी म्हणण्यास उपस्थित असणे जरूर असते; कारण काही गाणी उदाहरणार्थ, लग्नाची गाणी ही वारली स्त्रीच म्हणत असल्याने त्यांचीही उपस्थिती तितकीच महत्त्वाची असते.

यापुढची अडचण म्हणजे वारली एकत्र आल्यानंतरही त्यांच्याकडून गाणी वदविण्यासंबंधीची! गाण्यांच्या निमित्ताने जरी वारली एकत्र जमू शकतात, तरी गाणे म्हणण्यास ते तयार होत नाहीत. तिऱ्हाईत व्यक्तीसमोर गाणे म्हणणे हे त्यांना जरा चमत्कारिक वाटते. ती गाणी परका मनुष्य पाहिल्याबरोबर त्यांच्या तोंडून निघणे साहजिकच कठिण असते.

ही परिस्थिती उत्पन्न होण्याचे दुसरेही एक कारण आहे. आजपर्यंत त्या लोकांना 'तुमची गाणी म्हणून दाखवा' असा कोणीच आग्रह केलेला नव्हता. आताच हा आपली गाणी कशासाठी लिहून घेत आहे. याविषयी त्यांना भयमिश्रित औत्सुक्य वाटे. आपण गाणी म्हटल्यास व ती तिऱ्हाईताने लिहून घेतल्यास आपणास पुढे त्रास तर होणार नाही ना, अशी भितीही त्यांना वाटे.

अशा अवस्थेत समोर शे दिडशे वारली असून देखील आपल्याला जी गाणी पाहिजेत ती कशी मिळणार या विचाराने मन उदास होण्याची शक्यता असते; तथापि अधिक चिकाटीने प्रयत्न केल्यासच ती गाणी मिळू शकतात.

ज्या व्यक्तींच्या बरोबर मी डोंगराळ भागांत गेलो त्या व्यक्तींना ते वारली ओळखीत. 'गाणी म्हटल्यामुळे तुम्हाला

त्रास होणार नाही; उलट तुमची गाणी पुस्तकात छापली जाणार आहेत' असे अनेक प्रकारांनी व अनेक वेळा त्यांना सांगितल्यावर ते गाणे म्हणावयास तयार होत.

शेवटची पण अत्यंत महत्त्वाची अडचण म्हणजे ते गाणे बरोबर लिहून घेण्याची त्यांचे उच्चार काही ठिकाणी अस्पष्ट असत, काही ठिकाणी ते गाणे इतक्या लवकर म्हणत की ते लिहून घेण्याला पुरेसा अवसरच मिळू नये याकरिता प्रथम प्रथम मी गाणे लिहून घेण्याऐवजी ते कोणता शब्द कसा उच्चारतात आणि त्या गाण्याचा साधारण अर्थ कोणता आहे इकडेच लक्ष देत असे. पुढे पुढे आदले दिवशी रात्री वारल्यांना गाणी म्हणावयास सांगावयाचे व दुसऱ्या दिवशी गाणी म्हणणाऱ्या मोजक्या व्यक्तींना बोलावून ती त्यांच्याकडून सावकाश म्हणवून घ्यावयाची व उतरवून घ्यावयाची असा क्रम मला ठेवावा लागला.

असे करण्यामुळे दुसराही एक फायदा झाला. आदले दिवशी जरी मी खूप गाणी ऐकत होतों, तरी दुसऱ्या ठिकाणी ऐकलेली गाणी वगळून नविन तेवढी घेऊ शकलो. अलीकडचे वारली तरूण पालघर, डहाणू व क्वचित मुंबईला जात असल्याने सिनेमा, नाटक किंवा तमाशा यासारखी करमणुकीची साधने पाहण्याची त्यांना संधी मिळते, त्यामुळे त्यांच्या गीतात निराळेपणाच दिसू लागला आहे. नमुना म्हणून तसलीही तुरळक उदाहरणे मी घेतली आहेत. पण वारली लोकांच्या जुन्या लोकगीतांपासून ही गाणी फारच दूर गेल्यासारखी वाटतात.

वारली लोकगीते जमविणे हे आजच्या कामात अत्यंत आवश्यक आहे. आणखी काही वर्षांनी ती कदाचित् ऐकावयासही मिळणार नाहित. आदिवासी केंद्रे, सर्वोदय संस्था व सरकारी शिक्षणखाते यांच्या प्रयत्नाने मुलांच्या आचारात व विचारात झपाट्याने बदल होत आहे. अर्थात पुढची पिढी जी गाणी म्हणेल ती नवीन काळाला अनुरूप अशीच असणार.

आपल्याकडे कित्येक घराण्यांत वेदपठण केले जाते व एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला ते मंत्र जसेच्या तसे म्हणण्याची पद्धती सुद्धा शिकविली जाते. त्यामुळे उच्चार आणि शब्द या बाबतीत पुष्कळ दक्षता घेतलेली दिसते; तशी दक्षता वारली लोकगीतांच्या बाबतीत घेतली नसण्याचा संभव आहे; एखाद्या ठिकाणी शब्दांत बदल झालेला असतो किंवा वाक्यांचा अनुक्रम निराळा असतो ही गोष्ट तीन चार ठिकाणी विवाहाची गाणी थोडी भिन्न दिसतात यावरून दिसून येते.

वारली जमातीत लग्नासारख्या प्रसंगी उपाध्यायाची गरज लागत नाही; ते काम एक स्त्रीच करते व तिला 'धवलेरी' ही संज्ञा आहे. विवाहप्रसंगी म्हणावयाची गाणी तिला मुखोद्गत असतात. कित्येक भागात असे दिसून आले की पाच दहा खेड्यांत मिळून एकच धवलेरी असे व तिच्या सवडीप्रमाणे लग्नाचे मुहूर्त ठरविले जात.

वारली स्त्रियांच्या गीतांतील शब्द समजणे हे काम सुद्धा सरावानेच होऊ शकते. अशा काही विलक्षण हेल त्या बायका काढीत असतात की त्या आवाजात कोणती अक्षरे दडलेली आहेत याचा प्रथम ऐकणाऱ्याला पत्ता लागू नये उदाहरणार्थ 'बोरीखालची चोरी' हे गाणे ऐकत असताना 'च्' चा उच्चार 'स्' आहे किंवा काय असा भास आपणास होतो. उच्चार प्रक्रियेच्या दृष्टीने ही गोष्ट महत्त्वाची आहे. उच्चार प्रक्रियेसंबंधी स्वतंत्र विवेचन पुढील एका प्रकरणांत केले असल्याने त्याची अधिक चर्चा करण्याची येथे जरूरी नाही. गाणी घेताना किती प्रकारच्या अडचणी येतात त्याची स्पष्ट कल्पना येण्यासाठी केवळ या गोष्टींचा उल्लेख येथे करणे जरूर आहे.

अधिकृत गाणी लिहून घेण्यासाठी दुसरे दिवशी सकाळी काही वारली स्त्री पुरूषांना मुद्दाम बोलावून घ्यावे लागे. त्यांच्याकडून ती सावकाश ऐकून व शंका येईल तेथे जवळच्या माहितगार माणसास विचारून व खात्री करवून घेऊन ही गाणी जमविली आहेत. गाणी गोळा केल्यानंतर त्यासंबंधी विवेचन करणे हे त्या मानाने कमी त्रासदायक असते; परंतु अधिकृत गाणी जमविणे हेच फार कठिण काम आहे असा माझा अनुभव आहे. गाण्यातील भाषेसंबंधी विवेचन करताना ज्या शब्दांबद्दल शंका आल्या त्यासंबंधी पुन्हा एकदा स्वतंत्रपणे त्या वारली विभागात हिंडून मी खात्री करून घतली आहे.

ज्या वारली लोकांची गीते या प्रबंधात घेतली आहेत, ते ठाणे जिल्ह्याच्या निरनिराळ्या विभागात राहणारे आहेत; त्यांची वस्ती डहाणू व उंबरगाव ताक्यांत अधिक असल्याने तेथील गीतांची संख्या अधिक आहे.

वसा, वेवजी, कोचाई, कवाडा व धिमणिया यांपैकी प्रत्येक ठिकाणी दोन दोन दिवस मुक्काम केला होता. कासा, जव्हार, पालघर, चिंचणी आणि डहाणू इत्यादि ठिकाणी मी दोनदा किंवा तीनदा गेलो. उंबरगावास तर मी चार वर्षे राहतच होतो. दमणपासून पालघरापर्यंत सर्व भाग मी या चार वर्षात कित्येक वेळा हिंडलो.

उंबरगावचे जमीनदार श्री. सखारामपंत कारूळकर, तालुका मामलेदार श्री. बाऊसकर, आचार्य भिसे त्यांचे आदिवासी केंद्रातील अनेक सहकारी, मुंबई विधानसभेत आदिवासींच्या तर्फे निवडून आलेला चंद्रू बोधला हा वारली व नवशा नावाचा एक वारली शेतकरी या सर्वांनी ही गाणी जमविण्यासाठी साहाय्य केले आहे.

याखेरीज सुमारे दोन अडीच हजार वारल्यांच्या सहवासात गीते जमविण्याच्या निमित्ताने मी आलो. या सर्व वारल्यांचे मला साहाय्य झाले आहे. उंबरगाव आणि डहाणू विभागांत आदिवासींचा उद्धार करण्यासाठी सरकारने निरनिराळ्या खेड्यांत प्राथमिक शाळा सुरू केल्या आहेत. त्या शाळांतील शिक्षकांनीही जरूर त्या सूचना देऊन साहाय्य केले आहे. अशा रितीने अनेक हितचिंतकांच्या मदतीने व अनेक वर्षाच्या परिश्रमाने मला ही गीते गोळा करता आली.

वारली गीतांची पार्श्वभूमी :

वारली लोकांची जी गीते संग्रहित केली आहेत त्याचे विषयाच्या विवेचनासाठी ४ विभाग पाडले आहेत.

विभाग १ : देव, धर्म, जन्ममृत्यू विषयक गीते

विभाग २ : विवाह व प्रेमविषयक गीते

विभाग ३ : शेतीविषयक गीते

विभाग ४ : इतर गीते

लेखकांसाठी

'हाकारा' हे आदिवासी प्रश्नांना वाहिलेले एकमेव मराठी नियतकालिक आहे. यातून आदिवासी जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला, तसेच आदिवासी कार्यकर्ते व आदिवासींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, काही सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासीसंबंधीच्या कथा, कविता इत्यादी सर्व प्रकारच्या लेखनांस प्रसिद्धी दिली जाईल. आपण आपले साहित्य नियमित पाठवीत जावे.

–संपादक

विभाग १ : देव, धर्म, जन्ममृत्यू विषयक गीते

१. नमन (१)

चांदा र सूर्या नमू लागल्या,
ढगेसर ढेवा नमू लागल्या,
जुगा जातिला नमू लागल्या
ताडेसर ढेवा माडेसर ढेवा,
बलया ढेवा नमू लागल्या,
लंका रामाला नमू लागला
सुकेसर देवा नमू लागला,
इरा नमीन चालू लागली,
येर वडाला चालू लागली,
वनी वांदराला चालू लागली,
समदरी नमीन गेली निघून
बारा मारोलि गेली निघून,
समदिर लाटा नमू लागल
भिंगार माशाला नमू लागल
नमिन गेलि माह्या दुन्याल,
कालेसर ढेवा नमू लागल,

बुद्धनाक ढेवा नमू लागल,
मेघराजाला नमू लागल,
चारे खंडाला जोहार झाल,
पांच नगाल नमू लागल,
पांच पांडवाला नमू लागल,
हरमान देवा नमू लागल,
निघुन गेल ढवले पुराल
महादेवाला नमू लागल,
गंगा गवरी गिरजामाइला,
धरतरे बाय गो धरतरि बाय,
कनसरे बाय गे नमू लागल,
वंसी बाय गे नमू लागल
गावचे भगताला नमू लागल,
भरले सोभेल नमू लागल,
मि आहे दादु अजान बाल
आथा माझ्या राघु कुलम्ब्या

शब्दार्थ : ढगेसर - ढगांचा देव, जुगा जातिला - सर्व प्राण्यांना. ताडेसर - ताडाच्या देवाला, माडेसर-माडाच्या देवाला, बलया देव - शक्तीची देवता, सुकेसर-सुखाची देवता. [illegible] समुद्राजवळची जमीन, दुन्याल-दुनियेला, कालेसर-काळ देवता, हरमान-हनुमान, ढवले पुराल - शुभ्र नगरीला, अजान-अज्ञान, राघु कुलम्ब्या-एका मृत माणसांचे नाव

भावार्थ : वारली लोक कोणत्या देवांची भक्ती करितात ते आपणांस या नमनावरून कळतें. पुष्कळ देवांना त्यांत आवाहन केले आहे. चंद्र, सूर्य, ढग, ताड, माड, बल, सुख, काळ समुद्रांतील लाटा, मासे, विश्व, पांच पांडव, हनुमान, महादेव, गौरी, धरित्री इत्यादि देवतांचा त्यांत उल्लेख आहेत. धान्याची देवता (कनसरी) व वनस्पति (वन्सी) या देवतांनाही नमन आहे.

२. नमनाचे गाणे

वारली लोकांमध्ये धार्मिक सण उत्सव अत्यंत उत्साहाने साजरे केले जातात. अशा समारंभामध्ये त्यांचा पुजारी -'कामडी' याला अत्यंत महत्त्वाचे स्थान असते. सर्व धार्मिक विधी कामडीच पार पाडतो. कहाणी सांगण्यापूर्वी 'कामडी' हा देवांचे नमन गात असतो. ते नमनाचे गाणे -

देवा धीडना गायेला रे
धरतरी मायेला गायेला रे
वसा कुणबी गायेला रे
भातर वेली गायेला रे
कनसरी मायेला गायेला रे
रचने जुगत गायेला रे
जुगा खांबा गायेला रे
चारे खांबी गायेला रे
चारे खंडा गायेला रे
विजेशरा देवा गायेला रे
चंदर सूर गायेला रे
सुकेशर देव गायेला रे
भीमाबली गायेला रे
रामालक्ष्मण गायेला रे
बांडघोसे गायेला रे,
विजेशर देव गायेला रे
गाजेशर देव गायेला रे
ढगेशर देव गायेला रे
पावसे देव गायेला रे
वहाते गंगे गायेला रे
साळा सारणी गायेला रे
साती बेजाण गायेला रे
खोर-दऱ्या गायेला रे,
भगिर मासा गायेला रे
झिंगार मासा गायेला रे
सात पोह्या गायेला रे
बुरजाई देवी गायेला रे
गंगा देवी गायेला रे
भीमा देवी गायेला रे
भुइघर देवा गायेला रे
बारादुडी गायेला रे
मुसल्या डोंगर गायेला रे
पायली डोंगर गायेला रे
नवरा नवरी गायेला रे
महालखमी गायेला रे
गंभीर गड गायेला रे
पोकडा डोंगर गायेला रे,
बिरमला डोंगर गायेला रे
गावचे वाघया गायेला रे
गावचे भगता गायेला रे
गावचे तुरे गायेला रे
गावचे पाटिल गायेला रे
गावचे धवलेरी गायेला रे

शब्दार्थ : विजेशर - विजेचा ईश्वर, भातरवेल - मर्यादवेल : जुगत् - जगत्; जुगा-जगाचा; बांडघोस-लांब शेपूट असलेले पाखरू, गाजेशर-गर्जना करणारा, सारणी-मार्ग, बेजाण-ओहोळ, मगर-मासा, पोह्या-मार्ग, भुइघर-तळघ; बारादुडी, मुसल्या,पायली, पोकडा, बिरमला-डोंगरांची नावे; तुरे-वाजंत्री

भावार्थ : धार्मिक विधीच्या वेळी गायल्या जाणाऱ्या या नमनाच्या गाण्यामध्ये धरित्री, कनसरी, विजेशर, चंद्र,

सूर्य, सुकेशर, भीम, राम, लक्ष्मण, विजेशर, गजेशर, ढगेशर, पाऊस आदि देवतांचा उल्लेख आला आहे. त्याचबरोबर चारी खंडे, भातरवेली (वेलीचे गाव) बांडघोस (एका पक्ष्याचे नाव) वहाती गंगा, सोळा सारणी मार्ग, सात बेजाण (ओहोळ व नदी यांचा संगम) खारा दर्या, बुरजाई देवी, महालक्ष्मी, नवरा-नवरी, मुसल्या व पायली (डोंगरांची नावे), वाद्य वाजविणारा, गावातील पाटील व धवलेरी (लग्नाच्या वेळी गाणी म्हणणारी) यांचेही स्मरण केले आहे. धवलेरीला वारली लोक फारच मान देतात व लग्नाच्या वेळी उपाध्यायाचे आपल्याकडे जे महत्व तेच वारली लोकांच्या विवाहांत धवलेरीला असते.

टीप : वारली लोक नमन म्हणताना एकदा 'विजेशर' देवाला नमन केले असतानाही पुन्हा नमन त्याच कडव्यात करताना क्वचित दिसतात. याचा अर्थ त्यांची काव्यरचना जितकी काटेकोर बांधणीची असावयास पाहिजे तितकी नाही. वारली लोक चारच खंड मानतात कारण कोपरे चार आहेत.

३. देवांना आवाहन

आले कोनाचे देव, आले कुनबाचे देव
वरसा देवता आल्या, कुनबाचे घरी बसल्या
चंद्दर सूरय आनि सुकेसर किरनावर आला
वेडावत नारी, खोडावत नारी,
झेलावत नारी, फुलावत नारी,
विनावत नारी, गिनावत नारी,
आल्या सोने चौकाल,
शेंदरावत कुकवात देवो
आल्या सोने चौकाल,

मोगरावत नगरावत देवी
हलदावत नारी आल्या देवी
वाल्हो कान्हो आल चौकात,
तांब्या घेऊन बसल,
चिता देव आला सोने चौकाल
हरजी बालजी भगत
हिरोबा देव आल
भाव्याचे अंगी

भावार्थ : वारली लोक 'हिरोबा' किंवा 'हिरवा' या देवाला फार मानतात असे या गीतावरून दिसतें. झोपडीत ज्या ठिकाणी त्याची पूजा केली जाते ती जागा गाईच्या शेणाने सारवून स्वच्छ केलेली असते. पिठाच्या रेघांनी एक चौकोन काढून मध्यभागी तांदळाचा ढीग ठेवतात, व त्या ढिगांत हिरोबाची मूर्ती असते. मोराच्या पिसांच्या झुबक्यांत एक चांदीचा तुकडा असतो व त्यावर ढोबळ अशी मनुष्याकृती असते. हाच तो हिरोबा. त्याला आवाहन करिताना, त्याच्याबरोबर त्याच्या सात नारींचा उल्लेख केलेला दिसतो. त्या नारींची नावे पुढीलप्रमाणे :

१) खोडाय-वेडाय, २) हरनाय - कोपराय, ३) छापाय-मोगराय, ४) फुलाय-झेलाय, ५) सेंदरायं - कुकवाय ६) सेसाय-वेसाय, ७) गुनाय-पदमाय

याच गीतांत 'चिता' देवाचा उल्लेख आहे. वारली लोक जंगलात राहणारे आहेत व माणसांना उपद्रव देणाऱ्या हिंस्त्र पशूंच्या ठिकाणी देवत्व कल्पिण्याची जी पद्धती इतर समाजात दिसते तीच या ठिकाणी दिसते.

हरजी व बालजी या दोन भगतांचा उल्लेख या गीतात आहे. जादूटोणा, रोगराई इत्यादि अरिष्टांपासून तो लोकांना मुक्त करतो अशी समजूत असल्यामुळे त्यालाही मान दिलेला दिसतो.

४. नमन (२)

सूऱ्या समुख रहला र उभा
नमास कर जो र
दिव्या समुख रहला र उभा
नमास कर जो र
कामड्या समुख रहला र उभा
नमास कर जो र
देवासमुख रहला र उभा
नमास कर जो र
टालीसमुख रहला र उभा
नमास कर जो र
शंखासमुख रहला र उभा
नमास कर जो र
गोता समुख रहला र उभा
नमास कर जो र
पाटलासमुख रहला र उभा
नमास कर जो र
कारभारीसमुख रहला र उभा
नमास कर जो र
काठ्यासमुख रहला र उभा
नमास कर जो र

शब्दार्थ : टाली - वाद्य - झांज

भावार्थ : या गीतामधून कोणाकोणाला नमस्कार करायचे ते सांगितले आहे. सूर्य, दिवा, देव, झांज, शंख, त्याचप्रमाणे कामडी, पाटील, कारभारी, काठ्या, यासारख्या व्यक्ती वंदनीय आहेत असे सुचविले आहे.

टीप : काठ्या - गावमिराशी किंवा गावकामगार गावातील जन्म मृत्यूची नोंद पाटलाला सांगणे, दवंडी देणे, गुरे पकडणे व कातडे काढणे असे या काठ्याच्या कामाचे स्वरूप असते.

५. नमन (३)

नमूं गावचं देवाला ।
नमू राधईला । ढोल्लकीवाल्याला ।
मग सोंगाड्याला । नमू लावनीवाल्याला
नमू खेले देवाला ॥

शब्दार्थ : खेले देवाला - करमणुकीच्या देवतेला.

भावार्थ : तरूण वारली नमन म्हणतांना जुन्या गाण्यांतील देवांचा उल्लेख न करता निराळ्या पद्धतीने ते म्हणतात, हे या गीतावरून दिसून येते. राधई, ढोलकीवाला, लावणीवाला आणि 'गावच्या देवाला' त्यांत नमन केलेले आहे. 'खेले देवाला' म्हणजे खेळाच्या देवाला त्यात नमस्कार केला आहे. अलिकडचे तरूण वारली नाच गाण्यात गुंग असतांना कोणत्या प्रकारची गाणी म्हणतात याची कल्पना या गीतावरून येते.

टीप : 'लावनी' हा शब्द नव्या वारली वाङ्मयात म्हणजे अलिकडच्या तरूण मुलांच्या कवनात दिसतो. जुन्या वारली लोकांच्या प्रचारात हा शब्द दिसत नाही.

६. देवांच्या वस्तींचे गाणें

बालापुरच्या पिपलाखाल वसेल
बारिक बारिक देवांचे वसेल
मोटे मोटे देवांचे पंगती बसेल

भावार्थ : बालापुरच्या (गावांचे नांव) पिंपळाखालीं वस्ती झाली; लहान लहान देव तेथे राहिले व मोठ्या देवांच्या पंक्तिही होत्या. असे वर्णन या गीतात केले आहे.

७. नारन देवाचें गाणें

डोंगरा कात्रे, भागडी कांग्डोल
बत्तीस कांड, चोवीस मोहोर
चौथ्या मोहोरीच उजेड पड
ते उजेडीं कोन देव चाल
ते उजेडीं नारन देव चाल

शब्दार्थ : डोंगरां कात्रे - डोंगराच्या मेरेला किंवा कडेला, भागडी - वाकडी, कांगूडोल-वृक्षाचं नाव, कांड-फांदी, चोवीस मोहोर-चोवीस फांद्यांना मोहोर आला, उजेड पड-चौथ्या फांदीला जो मोहोर आला त्याच्या फटीमधून जमिनीवर तेजस्वी प्रकाश पडला आहे.

भावार्थ : डोंगराच्या कडेला कांगडोल वृक्षाच्या फांद्या मोहोरून गेल्या आहेत. या मोहोरून आलेल्या फांद्याच्या फटीमधून तेजस्वी प्रकाश जमिनीवर पडला आहे, जणू काही गालिचाच तयार झाला आहे. अशा या गालिच्यावरून नारन देव चालत आहे अशी रम्य कल्पना या गीतातून मांडली आहे.

८. नारन देव (१)

तु नारनदेव मागनेला गेला
पन धरतरी घाल बसकार
कनसरी कर सिन्‌गार
तु नारनदेव मागनेला गेला
पन चंदरकला खांबासी उभी
नारनदेव वराजा, हलदाइ सवासनी
न लखमाय त नवरी झाली
न देवगोत वराडी
नारनदेव मायबाप
आम्ही तुझे लेकरे खांदे झोंबलो
लख्मापत माया, आम्ही लेकरें आंकडे झोंबलों
गिरजाय माय, आम्ही लेंकरें आंकडे झोंबलों
कनसरी माते, आम्ही लेकरें आंकडे झांबलों

शब्दार्थ : मागनेला-मागण्याला, याचनेला; बसकर घाल - बसलेली होती, खांबासी - खांबाला टेकून; वराजा, वराडी-वऱ्हाडी, खांदे झोबलो-खांद्याला चिकटलो, आकडे-मांडी

भावार्थ : 'नारन देव' हा पिता आणि 'लखमाय्' (लक्ष्मी) ही माता असल्याचा उल्लेख या गीतात आहे. नारनदेवाच्या लग्नाला देव हे वऱ्हाडी होते, 'हलदाई' ही सुवासिनी होती. आम्ही सर्व तुझी लेकरे आहोत; आम्ही तुझ्या अंगाखांद्यावर खेळतों इत्यादी वर्णनांत सुसंबद्धता कमी असली तरी नारन देवाचा मोठेपणा स्पष्टपणे वर्णन केलेला दिसतो.

९. नारन देव (२)

कानु मातेच्या दारी भरला दरबार
पन नारन देव कर कारभार
कनसरीच्या दारी भरला दरबार
पन नारन देव कर कारभार
तपेसऱ्याच्या दारी भरला दरबार
पन नारन देव कर कारभार
महादेवाच्या दारी भरला दरबार
पन नारन देव कर कारभार

शब्दार्थ : कर-करतो, तपेसऱ्या-तपाचा ईश्वर

भावार्थ : वारली लोकांमध्ये नारनदेव हाच सर्वात महत्त्वाचा देव आहे हे वरील गीतामधून स्पष्ट होते. कनसरी मातेच्या घरी दरबार भरलेला असो, तपेसऱ्याच्या दारी दरबार भरलेला असो किंवा महादेवाच्या दारी असो नारनदेव हाच सर्व व्यवस्था करत असतो असे म्हटले आहे.

त्याचप्रमाणे सुरेनारायण (सूर्य) चांद सूर्य, इंद्र, गोकुल, नौकुल, (नकुल) सहिदेव (सहदेव) भिंवा बल्या (भीमबली) यांची नावें घेऊन त्या सर्वांपेक्षा नारन देव श्रेष्ठ आहे असे वारली लोकांच्या गाण्यातून स्पष्ट दिसते.

१०. सभा

आमी आला सभाला र सुभाला र
हि रे सुभा कोनाची र कोनाची
हि रे सुभा नारानु देवाची र देवाची
हि र सुभा कोनाची र कोनाची
हि र सुभा हिरोबा र देवाची
हि र सुभा वाघोबा र देवाची
हि र सुभा कोनाची र कोनाची
हि र सुभा बराम्हु र देवाची

शब्दार्थ : सुभा - सभा, बराम्हु - ब्रम्हदेव

भावार्थ : निरनिराळ्या देवांच्या ज्या सभा भरतात त्या सांगताना नारनदेव, वाघोबा, हिरोबा, बराम्हु (ब्रम्हदेव) यांचा उल्लेख करून त्या त्या देवाच्या सभा भरतात असे वर्णन या गीतामधून केले आहे.

११. नारन देव (३)

वार ग झुले पिपल खलाल
नारन देव पानी सलाल

शब्दार्थ : झुले-हेलकावे खातो, सलाल - खळखळून वाहणे

भावार्थ : नारनदेवामुळेच वारा झुळझुळ वाहतो, पिंपळांची पाने सळसळ असा आवाज करितात. आणि पाणी खळखळ असा आवाज करीत वहात असतें असें म्हटलें आहे. निसर्गात जें काही घडतें तें या नारन देवामुळेच होतें अशी वारल्यांची समजूत दिसते.

१२. देवसभा

इ सभा कोन्हाची र
दिवा लावला लोन्याचा र
सभा बसली सोन्याची र
इ सभा कोन्हाची र
हिरोबा देवाची र
माझे हिमाय देवीची र
माझ्या बरम्भु देवाची र
बइ नारनु देवाची र

भावार्थ : या लोकगीतातून देखील आपल्याला देवसभेचे दर्शन होते. सभेच्या ठिकाणी लोण्याचा दिवा लावला आहे. या सभेमध्ये हिरोबा, हिमाय, बरम्भु (ब्रम्हदेव) व नारन देव असल्याचे सांगितले आहे.

टीप : वारली लोक सभा हा शब्द स्पष्ट म्हणत नाहीत किंवा 'सुभा' असाही उच्चारत नाहीत; तर 'सभा' व सुभा यांच्यामधला असा निराळाच उच्चार करतात.

१३. चांदणे

डोंगराच्या केलनील कुंवर कांद फूलय
नगराच्या केलनील कुंवर कांद फूलय
तें गे फुलांचे, चांदना गे पाडय
तें गे चांदनातु, कानु देव खेलय
तें गे चांदनातु, नारन देव चालय

शब्दार्थ : केलनील-कडेला, कांद-कंद, चांदनातु-चांदण्यात

भावार्थ : डोंगराच्या कडेने, नगराच्या कडेने कोवळे कंद फुलले आहेत, फुलांचे जणू काही चांदणेच पडले आहे. अशा या चांदण्यात 'कानुदेव' खेळत आहे तर 'नारन देव' विहार करत आहे अशी अत्यंत रम्य कल्पना या गीतातून मांडली आहे.

१४. जत्रा

देवांचे घरदार तें, गेलं वो जत्रे
साडिचे गाडले ते, भरून गो आलें
चोल्याचें गाडलें तें, भरून गो आलें
गाठ्याचें गाडलें तें, भरून गो आले
बाशिंगाचे गाडले तें, भरून गो आले

शब्दार्थ : सांडीचे गाडले - साड्यांच्या गाड्या

भावार्थ : ज्या ज्या ठिकाणीं जत्रा भरते त्या त्या ठिकाणीं वारली लोक भा[illegible] जातात. ही जत्रा भरते याचे कारण ते स्थान म्हणजे देवाचे घरदार ही कल्पना वारल्यांची दिसते. या जत्रेच्या वेळी जोडवीं, बाशिंग, साड्या इत्यादि अनेक वस्तू विक्रीकरिता आणलेल्या असतात. व गाड्या भरभरून त्या वस्तू आणल्या जातात असें वर्णन या गीतांत आहे.

१५. जन्म-मरण

मानजाचि काया नोय दादु मील
बरभा दोशाल बोलाना केला,
सत्ये मावलिला बोलाना केला,
जम्मु देव राजा आला निघुन,
सोने पलंगावर जम्मु देव बस,
सति मावलि अक्षरा लिखजा,
मेनाच्या काया र मेनाच्या काया
ढकलुन दिलाबा नरका खाडित
मानजाचे पोटि नरकाचि खाडी
नरका खाडित यो जिवदा येय,
नरका खाडित जिवदा वाढय,
नव महना झाला नव महना झाला
नरका खाडिशि जिवदा पडला,
धरती पडला धरती पडला,
सति अक्षरा तोकडि लिहलि,
दिला जिवंदा माल मागत नेयं
येरा मरणाचा हेवा नाही दावा,
अेखल्याचा जाना बा अेखल्याचा येना,
येतया तोड्या सांकड्या वाटा
जात्या तोड्या पघल वाटा
अशी देवान् वरदाना दिली
अशा मानजाला सया ठेवल्या
अेकाचा घरा रडा, सगलिंचा रडा,
झाडपान रड, किडि मुगलि रड
असा दादा बा नको र करू,
जाचे घरा मढा त्याचेच रडा

शब्दार्थ : मानज-मनुज; नोय-नाही, मिल-मिळते, बोलाना-बोलावणं, दोशा - जुना, सत्यो मावली-सती माता, सति मावलि अक्षरा लिखजा-सती माता अक्षरे लिहिते, मेनाच्या काया-मेणाचे शरीर.

भावार्थ : माणसाचा जन्म कसा झाला आणि त्याला मृत्यु आला म्हणजे काय होते याविषयीचे विचार वरील गीतामध्ये व्यक्त केले आहेत. त्यावरून असे दिसते की माणसाचे शरीर दुर्लभ आहे. बरभा आणि देवी सती यांना बोलावणे केले. जम्मु देवाला बोलावले. बरभा हा लेखणी घेतो आणि देवी सती अक्षरे लिहिते. माणसाचे शरीर हे मेणाचे आहे. नरकाच्या खाडीत जीन टाकला, कारण माणसाच्या पोटात नरकाची खाडी आहे. त्या खाडीत गर्भ वाढतो, नंतर त्या खाडीतून तो जमिनीवर पडतो. देवी सती ही तोकडी अक्षरे लिहिते. जो जीव दिलेला होता तो परत मागून घेतला. या मृत्यूला हेवा किंवा द्वेष नाही. मनुष्य एकटा येतो आणि एकटा जातो. जगांत येण्याच्या वाटा अरूंद आहेत. परमेश्वरानेच हा शाप दिला आहे. एकाच्या घरी मृत्यूमुळे दुःख असेल तर सगळीकडेच शोक असतो झाडें, कृमिकीटक, मुंग्या सारी रडतात, परंतु हे मित्रा, असें करू नको, ज्याच्या घरी मरण त्याच्याच घरी शोक असावा.

१६. मृत्यू (१)

वारली लोक मृताचे दिवस करतात; व त्यावेळी कामडी हा जें गाणं म्हणतो तें पुढं दिलं आहे.

हरिचंद्रा धीर राया रामा SSS हा हा हा SS
रामा गेला रामचं खंडाल
सीता गेली सीताचं खंडाल
नवला गेला नवल्या खंडाल
जोहार लागला कुनब्याच्या हातीं
सलाम लागला मुसल्याच्या हातीं
नमास लागला बामनाच्या हाती
कावा दावा लागला वारल्याच्या हाती
थोडाक् लागला काठ्याच्या हाती
थोडाक् लागला कारबाऱ्याच्या हातीं
थोडाक् लागला बामनाच्या हाती
निगून गेलं हिंसेमानील
शिसवीचा बूड जंग पारखला
झाडं जंग बूड तोडला
ते बूडाचा ओंडा पाडला
चार पाट जंघा काढल्या
नेऊन टाकल्या सुताऱ्या दारीं
सुतारी दादा दारी निगाला
दादा तुल काय कमी पडली
याची डाक घडून जंग दीजो
त्याला लागला खोरा महाराच्या हाती
दोरा लागला लोट्याच्या हाती
डाक रतली सजली हा हा SS
ती दिली बामनाच्या हाती
ये र बामनानं डाक ठोकली
याचा आवाज जंग फुटला
ईशर देव बोलू लागला
मानजी मातल काज करत
दुनियेला जाऊ, दादू, दुनियेला जाऊ
निगून गेला अेक दोनी टपाल
ये र दादू चलतोच जात S S
निगून गेलं अेक गावाल
निगून गेलं दोन गावाल
निगून गेलं तीन गावाल
निगून गेलं चार गावाल
निगून गेलं पाच गावाल
निगून गेलं सहे गावाल
निगून गेलं सात गावाल
निगून गेलं आठ गावाल
निगून गेलं नऊ गावाल
निगून गेल दहा गावाल
निगून गेलं खनगर, डोंगराल
निगून गेल र 'बत्ती' सुळ्याल
निगून गेल र गायकवाडाल
निगून गेल र बायको राजाल
निगून गेल र पेशवे राजाल

शब्दार्थ : नमेस-नमन, कावादावा - कपट, काठी-पोलिस पाटल्याच्या हाताखाली १० फुटी काठी धरणारा एक सरकारी नोकर असतो; त्या नोकराला 'काठ्या' अशी संज्ञा आहे, हिंसेमानीला-मान म्हणजे झाडी; व हिसे हें नांव, जंग-दोन अर्थ-मोठे हा एक व लवकर हा दुसरा; जंघा-तुकडे, सुताऱ्या-सुताराच्या, डाक-डमरू, खोरा- कातडें, लोट्याच्या-बोहऱ्याच्या, रतली-मढवली, (डाक-डमरू), ठोकली-वाजवली.

निगून गेल र रक्षे राजाल
निगून गेल र पारशी राजाल
निगून गेल र बामनी राजाल
निगून गेल र नवखंड धरती मझार
वरत नांगोली उजेड नगरी
खालत नांगाला गोल अंकार
आजूबाजू नांगाला काला नीला पानी
चला र दादू मागे वलावा
कणगा डोंगर गेला खसून
राक्ष्या ग माड्या गेल्या ढोलून
पारशी ग राजा गेला मरून
भीमबल्या बाई गेला खसून
राजबावी ग गेल्या आटून
खारा ग समदिर गेला ओहटून
भिंगारमासा गेला मरून
काचंच घड गेलं फुटून
हातीचं चूड गेलं फुटून
गल्याचा हार गेला तुटून,
मनून मणी नाही ग वेसाय
मनून मणी नाहीं ग सांधाय
काच ग घड नाहीं ग सांधाय
दोघं जगमाई केला विचार
दोघं गोहं दोघ बायका केलं तयार
निगून गेलं निबराच्या भारी
जाने उभी रहली शीतल छाये
येर ग बाई जनगोठी केल्या

निगून गेलं शहर मझार
निगून गेलं कुंभार ओलीला
कुंभारदादा दारीं ग निगाला
काय रं दादू कामं पडली
आमाला येथ लोट पाहिजे
घरांची ग लोटी दारी काढली
येरा लोटी हेरून गिजारस
येर दादून रोकडी दाम दिल सोडून
निगून गेलं पुढच्या ओलील
वाणीसा ग दादा दारीं निगाला
काय रं दादू कामं पडली
आमाला पाहिजे परदन्या
उभा मापतना, आडवा फाडला
येर ग दादूनं रोकडी दाम दिलं सोडून
निगून गेला ग लोट्याच्या ओली
लोट्यासा दादा दारीं निगाला
काय र ग दादू कामं पडलीं
गांठी काकणी दोर जंघ पाहिजे
बायकोचं पाहिजे का गोहल्याच पाहिजे
कुवारी पाहिजे का लगनाची पाहिजे
शेंदराचा पुड्या जंग पाहिजेत काय
येर ग दादूनं रोकडी दाम सोडून दिली
येर ग दादू निगून गेली वाडोली ओली
वाडोला दादा दारी ग निगाला
काय र दादा कामं पडली
आमाला पडली नारलाची काम

शब्दार्थ : मानजी मातल-माणसं बिणसं, काज-काम, टपाल-टप्पे, सहे-सहा, खनगर-डोंगराचे नांव, बत्तीसुळ्यास-त्या नांवाच्या डोंगराला, बायकोराजाल-झाशीच्या राणीच्या राज्याकडे, रक्षेराजाला-राक्षसांच्या राज्याकडे, मझार-मध्यें, नांगाली-दिसली, अनूकार-अंधार, वलावा-वळूंया, कणगा-डोंगराचे नाव, खसून-खचून किंवा ढासळून, ढोलून-कोसळून, भीमबल्या-तलावाचा बांध, राजबावी-मोठी विहीर, समदिर-समुद्र.

घराची गोणी दारीं काढली
दोन ग नारल हेरून गिजा
रोकडी ग दाम दिली सोडून
येर ग दादू गेला निगून
निगून गेला कापड्याच्या ओले
डाल, मुंबरा, खजूर कोपरं जंग बांध जो
येर ग दाम दिली रोकड सोडून
निघून गेला माशाच्या ओले
माशी ग दादा दारि निगाला
बोंबिलाच्या पेंडी जंग पाहिजेत
येर ग पेंडी जंघ साटवल्या
येर ग दाम दादून सोडून रोकड दिलं
चला चला दादू, चला चला जाऊ
क़ल वरवत जंग झाला रं
भूक लागली ग तान्ह लागली
निगून गेलं अेक टपाल
निगून गेलं दोन, टपाल
ये गो बाई उतावली कर जा
ये गो बाई भाजी पाला जंग खालला
चला चला दादू, चला चला दादू,
निगून गेलं तीन गांवाल,
निगून गेलं चार गांवाल,
उभी राहा जंग उभी राहा जा
सात ग चौक्या भरतच जाव
निगून आला गांवा मझार
निगून आल, घराशी आलं
वाटव्याला सूर पाहिजेत, घेऊन ये ग
येर दादू खाला पिला दारी आलं
देशाचं सामान वाडीशी ठेवला
ये र ग दादू निगून गेला उपजे डोंगराल
सागाचा सोटा जन्‌गा तोडला
ये र दादू निगून गेला कसन्या मानील
निगून गेला रोहडीमानील
रोहडीच्या थोंबी, जन्‌ग तोडल्या
येर सामान जन्‌ग बांधला
भारा बांधून दारीं आनला
काशीचा बामन जन्‌घा आला
ये र ग बामनान आडवा उभा मापला
ये र ग बामनान दिशाला मांडव घातला
दिशाच सामान मांडवा आनला
येर ग बामनान माल्या गुतल्या
सकालचं पहारा उंगत्या सूर्याला
निगून गेला, सोन्या ओराला
येर ग भाव्यानं आनली खून कादून
नातं गोतं ओलखून घी जो
काका मामा फय ओलखून घी जो
यो र खंड मी दिला सोडून

शब्दार्थ : भिंगारमासा-नांव, काचं घडं-कच्ची मडकीं, चूड-बांगड्या, चुडा गल्याचा-गळ्यांतील, मनून-म्हणून, वेसाय-वेचण्याला, नाही ग वेसाय-वेंचता येत नाहीं. जगमाई- पतिपत्नी, गोह-पुरूष, निबराच्या भारीं-भर उन्हांत, जान-जाऊन, जनगोठी-गोष्टी, ओलील-आळीला, लोटं-मातीची भांडी, येरा-दुसरी, हेरून-पाहून, गिजास-घ्या, परदन्या-लंगोट्या, जंघ-सर्व, वाडोली-वाडवळ (वाडीवाले), गिजा-घ्या (आज्ञार्थ). कापड्याच्या-कापडी याचा अर्थ गूळ, नारळ व भाजीं विकणारा मनुष्य, कोपर-खोबरं, माशाच्या-माशी म्हणजे मच्छी-मत्स्य या पासून हा शब्द तयार झाला आहे. आजहि माछी याचा अर्थ मासे मारणारी जात अ्सा उंबरगांव व डहाणू विभागांत रूढ आहे. ओले-

ओळीला, बोंबिलाच्या -बोंबील म्हणजे एक प्रकारचा विशिष्ट मासा, पेंडी-समूह, साटवल्या-एक दम घेतल्या, कल-काल, तान्ह-तहान, टपाल-टप्पा, उतावळी-घाई, भरतच-खात पीत, गांवामझार-गांवामध्ये, वाटव्याला सूर-वाटेवर चालून आले म्हणून जी दारू ती वाटव्याची दारू, खाला-खाल्लं, पिला-प्याला, वाडीशी-वाडी म्हणजे वई, व वई म्हणजे कुंपण, उपजे डोंगराला-पूर्वेच्या डोंगराला, कसऱ्या मानील-कसऱ्या नांवाच्या जंगलाकडे, थांबी-मुळासकट, मांडवा-मांडवाकडे, माल्या-माळा, गुंतल्या बनविल्या, उंगत्या-उगवणाऱ्या, सोन्या ओराला-सोन्याच्या खोलीकडे, भाव्यान-पितर म्हणून ज्याची संभावना करितात त्यानं, फूय - आत्या.

भावार्थ : मृत माणसाचे दिवस करतात त्यावेळी कामडी हे गीत म्हणतो. या गाण्यामध्ये दिवस करण्यासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टींचे अत्यंत बारकाईने चित्रण केले आहे. अगदी कोणत्या लाकडाचा बुंधा घेतला त्याच्यापासून सुताराने डमरू कसे तयार केले, त्याला कातडे कोणते घेतले इत्यादी वर्णनापासून ते ब्राम्हणाने कापड आणून मांडव कसा घातला नंतर माळा कशा गुंफल्या वगैरे सर्व प्रकारच्या वर्णनांनी भरलेली अनेकविध माहिती त्या गाण्यांत दिसते.

टीप : वारली लोकांत मृताचे दिवस करण्याची जी चाल आहे तिचें स्वरूप पुढीलप्रमाणे : रात्री आठ वाजता तो विधी सुरू होतो व दुसरे दिवशी दुपारी बारा वाजेपर्यंत तो चालतो. 'वेवजी' या खेड्यांत तो विधी पाहण्यासाठी मी मुद्दाम गेलों होतो; त्यावेळी तेथील दृश्यावरून व कामड्याकडून (दिवस करताना गाणी म्हणणारा वृद्ध गृहस्थ) बरीच माहिती मिळू शकली ज्या ठिकाणी दिवस केला जात होता तेथे चार काठ्या उभारून एक लहानसा मंडप तयार केला होता; व त्या मांडवावर भाताची पेंड पसरलेली होती.

मंडपाच्या खाली दोन मडकी ठेवली होती कारण त्या दिवशी दोघांचे दिवस करावयाचे होते. त्या मडक्यावर एक एक झाकण होते व त्यात एक नारळ होता. त्या गाडग्याच्या गळ्यांत चांदीच्या पुतळ्या व साखळ्या घातलेल्या होत्या. या मडक्याच्या खाली पांढरे फडके अंथरलेले होते.

जवळच दोन मोठाल्या टोपल्या होत्या व त्यात भाताचे दाणे होते. शेजारी कागदाच्या पुडीत शेंदूर होता. एक दिवा तेवत होता व त्याला वारें लागू नये म्हणून केळीच्या पानाचा आडोसा उभा केला होता.

मंडपावर दोन सुपे होती व त्या सुपात जे द्रोण होते त्यात तांदूळ व लहान पातळ चपात्या होत्या, प्रथम पूजेची सर्व सिध्दता झाली व नंतर सर्व लोकांनी जेवण केले. नंतर ते सर्व जण घरापुढील अंगणात आले. ज्या मृताचे दिवस केले जात होते त्याचे सर्व नातेवाईक व ओळखीचे लोक बोलावले होते. ते सर्व एकत्र आल्यावर कामडी गाणी म्हणून विधीयुक्त दिवस करूं लागला. बाजूला झांजा घेतलेले तिघे जण होते. ते फक्त कामड्याने म्हटलेल्या ओळीच्या शेवटी 'आ' 'आ' असा सूर काढीत. दिवस करतांना जें प्रदीर्घ गीत म्हटले जाते त्यांत अनेक विभाग असतात. मृत मनुष्याचे जीवन त्याचा विवाहसुद्धा वर्णन केलेला असतो. गाणे म्हटले जात असताना मधूनच ज्या वेळी कामडी हा मृत व्यक्तीच्या नावाचा उल्लेख करी त्या त्या वेळी जमलेल्या स्त्रिया सूर काढून रडत पुन्हा गाणे सुरू होई; पुन्हा काही वेळाने तो उल्लेख आला की त्या पुन्हा रडत असा हा कार्यक्रम दुसरे दिवशी दुपारपर्यंत चालतो असे त्या कामड्याने मला सांगितले.

१७. मृत्यू (२)

बोलता चालता गोहाचा मारना
भरेल गाडी जाय् उलथून
पाठिचा भावा जावा मारावा
बोलता चालता भार जायचा मारना
भारजाय दादु र महना रहेल
अेक वेल येचि मरनाची येला
गोहा दादु र झाडावर चढला
हात पाहता याच जायं निसठान
लाखि चिकया जाय तावान

जिन्याचि कोडि गेलि सुकून
वेलिचा वांसा नेला खुडून
भाजिचा माडा गेला कोमून
तशी र काया गेलि कोमून
पुनवेक चांदु गेला मावलून
केलिचा खांब दादु गेला ढलून
काच्या, घड्याचा काहि तरि दीस
कायेचा दादु नाहि काही दिस

शब्दार्थ : गोहाचा - पुरूषाचा, मारना - मरण, भाव - भाऊ, जाबाब - शब्दांनी, भारजाय - बाई, हातपांहा - हातपाय, निसटान - निसटून, लाखि चिकया - लाखेचा चिकट रंग, भाजिचा माडा - भाजीचं रोप

भावार्थ : वरील गीतामध्ये त्यांची मृत्युविषयक विचारसरणी आहे. चालतां चालतां किंवा बोलता बोलता सुद्धा मनुष्य मरतो. भरलेली गाडी एकदम उलथून पडते. एखादी स्त्री गर्भवती आहे; पण तीही कदाचित मृत्यू पावते. मनुष्य झाडावर चढतो आणि अचानक त्याचे हातपाय निसटतात. लाखेचे शरीर एकदम वितळून जाते. वेलीचे रोप खुडून टाकावे किंवा भाजीपाल्याचा देठ कोमेजून जावा त्याप्रमाणे शरीर सुकून जाते. पौर्णिमेचा चंद्र मावळला, केळीचा खांब ढळला, कच्चे मडके फुटले, त्याप्रमाणे शरीर पडले. त्याचा काही नियम नाही. जीवनाची क्षणभुंगरता वारल्यांच्याही गीतात स्पष्टपणे व्यक्त झाली आहे.

१८. शोकगीत

माझे लाडके भावा येरे येरे
माझी पाठ कोन राखिल रे भावा
माझे गोरे गोरे दादा
माझे भावा येना येना
माझा बंधु कोट गेला रे देवा
अेखला कोट गेला रे देवा
माझे मायाले दादा
तुला कोट नांगू रे भावा

भावार्थ : वारली स्त्रिया भाऊ मेला तर कसा शोक करतात याचे अस्पष्ट वर्णन आहे. हे माझ्या गोऱ्या भावा, माझी पाठ आता कोण राखील', हे माझ्या लाडक्या भावा, तू ये रे, तू मला राहून एकटा कोठे गेलास? तुला मी आता कोठे पाहू? शोकगीत ज्याला म्हणता येईल तसे या गीताचे स्वरुप आहे.

विभाग २ : विवाह व प्रेमविषयक गीते

१९. वधूपरीक्षा

डुंगरी गजरा पेर भाबी जोवा रे जांय
पेटी मां जोडवा पेर भाबी जोवा रे जाय
पेटी मां साडी पेर भाबी जोवा रे जाय
पेटी मा मसरू पेर भाबी जोवा रे जाय

भावार्थ : आपल्याला 'मुलगी' पहायला जायचे आहे, तेंव्हा हे वहिनी, तू कपडे कर' असें एक नणंद आपल्या भावजयीला सांगत असल्याचा उल्लेख या गीतामध्ये आहे.

टीप : या गीतांचे दुसरें एक वैशिष्ट्य म्हणजे या गीताची भाषा गुजराती वळणाची आहे. काही ठिकाणी धोडी, दुबळे व वारली एकाच शेताजवळ राहतात. धोडी व दुबळे हे गुजराती वळणाची भाषा बोलत असल्याने एखादे तुरळक गीत वारली लोकांनी म्हणणे साहजिक आहे.

२०. घर

घर बांधले सागल्या सरींच्या
कुड भरीला काचेच्या ओवऱ्या
कोनोजी नवरा तिथ बसला
तिथ बसला नवरोजी नवरा



शब्दार्थ : सागल्या - सागाचे, सर-दांडे, ओवरी-खोली

भावार्थ : वरील गीतामध्ये एक स्त्री आपल्या मैत्रिणीला विचारते की तुझ्या घरी कोण बसलेला आहे, त्यावर ती उत्तर देते -

''सागाच्या लाकडाचे घर आहे, त्याला कुडाच्या भिंती आहेत. खोल्यांना काचेची तावदाने लावली आहेत व त्या खोलीत जो दिसतो तो माझा नवरा आहे.''

टीप : वारली लोकांच्या घराला काचेची तावदाने नसतात व पुष्कळदा सागवानी लाकडाचे दांडेही त्यांच्या झोपड्यांसाठी वापरले जात नाहीत. परंतु जे पारशी, गुजराती किंवा महाराष्ट्रीयन जमीनमालक आपल्या शेतीवाडीत बंगले बांधतात त्याच्या घराला वरील वर्णन लागू पडते. कल्पनेत का होईना, तसे घर आपल्याला असावे अशी इच्छा या गाण्यात डोकावली असण्याचा संभव आहे.

२१. मंडप

दर खणली मुरमेची
मेढि टाकली लोखंडाची
दांडे टाकले पितलाचे
अलवन टाकले रूपाचे



शब्दार्थ : दर-खड्डा, मेढि-खांब, अलवन-छत

भावार्थ : विवाहसमयी दारामध्ये मंडप घालणे ही एक महत्त्वाची गोष्ट आहे. बहुतेक वेळा बांबूच्या सहाय्याने मंडप उभारून त्यावर झाडाच्या पाल्याने सजावट केलेली आढळते. गीतातील वर्णन मात्र आदर्श मांडव कसा असावा याविषयी आहे. उत्तम मुरूम घालून जमीन चांगली तयार केलेली आहे. लोखंडाचे खांब उभे केले आहेत. त्यावर पितळेचे आडवे दांडे बांधले आहेत व रूप्याचे छत त्यावर घातले आहे.

२२. हिंदोळ्यांचे गाणे



नौरेचं अंगण गोर निरमल
तेत उपजल पारू पिंपळ
तेच्या खांद्या गेले उगवत मावळत
मावळतच्या खांद्या बांधे हिंदोल
तेवर बसेल कोनु नवरा
तेवर बसेला नौशा नवरा
ये र बापा माल हिंदोल
ओडत रे बापा माज सहुल

शब्दार्थ : नौरेचं - नवऱ्याचें, गोरं-स्वच्छ, निरमल-पवित्र, तेत-तेथें, खांद्या-फांद्या, मावळत-पश्चिमेच्या बाजूला, हिंदोल-झोंपाळा, नौशा-नांव, ओडत-एवढाच, सहुल-हौस

भावार्थ : आपल्या नवऱ्याने आपली हौस पुरवावी असें वारली नवविवाहित स्त्रियांना वाटणें साहजिक आहे व तशाप्रकारची आवड या गीतामध्ये दिसते. या गीतातील स्त्री म्हणते -

"माझ्या नवऱ्याच्या घरांत स्वच्छ अंगण आहे. या अंगणात पिंपळ वाढावा व त्याच्या फांद्या पूर्वेकडे व पश्चिमेकडे जाव्यात. मावळतीच्या बाजूला जी फांदी जाईल त्या फांदीला एक हिंदोळा बांधावा; त्यावर पतीने बसावे व मलाही तेथे बसवून झोके द्यावे अशी माझी हौस आहे."

२३. वस्त्रालंकार

सरसर गोणी लोटल्या
माझ्या दारी तू तांबडे महालात
कशाचा विक्रा घातला
तू माझे तांबडे महालांत
साडीचा विक्रा घातला
तू माझे तांबडे महालात
कशाचा विक्रा घातला
तू माझे तांबडे महालात
पासोड्याचा विक्रा घातला
तू माझे तांबडे महालात
कशाचा विक्रा घातला
तू माझे तांबडे महालात
बाशिंगाचा विक्रा घातला
तू माझे तांबडे महालांत

भावार्थ : लग्नासाठी कपडें करणें ही बायकांची मोठी हौस. त्या प्रवृत्तीला वारली स्त्रिया अपवाद नाहीत हें वरील गीतातून दिसतें. वधूकडच्या स्त्रिया, लग्नाच्या आधी साधारणपणे अर्धा तास, कपड्यासंबंधी जें गाणें म्हणताना तेच हें ! माझ्या तांबड्या रंगाच्या महालांत तूं (पती) साड्या, चोळ्या, बाशिंग, इत्यादि वस्तू आणून टाकल्या आहेस, असे वधूचें म्हणणे त्या गाण्यात दिसते.

२४. कंकण

हातींचा कडा कायरं केला देवा,
कोन नवरा झाला, तेल दिल्हा

भावार्थ : या छोट्याशा गीतामध्ये असा विषय आहे की एक स्त्री आपल्या मैत्रिणीला हातांतील रूप्याचे कडे काय झाले म्हणून विचारते. त्यावर ती मैत्रिण पुढील उत्तर देते. "जो माझा नवरा झाला त्याला मी ते कडे देऊन टाकले."

२५. दागिन्यांचे गाणें

गलून गेलेलं पानी आई
जाय तरी कोन्हे वाट
दामूदादाची मोटर ग
बसली मोटरीमधी आई
उतरली वजल्यावरी
खुडवी न् सवयाच्या भाज्या
नेइक मनोरे बाजारा
बोलवील सोनारी दादाला
देईल सोनारी दादाला
घडविनु भरगोटीचा जोड
देईन कोने नवऱ्याला
देईल नवरोजी नवरीला

शब्दार्थ : वजलें - गावाचें नांव, सवय-एक प्रकारचे गवत, मनोर-एका गांवाचे नाव, मनोरे-मनोरच्या

भावार्थ : नवऱ्याला आवडणारा अलंकार देण्यासाठी आपल्या आईने काय केलें याचें वर्णन एक वधू आपल्या मैत्रिणीजवळ करीत असल्याचा भाव वरील गीतामध्ये दिसतो. ती म्हणते की आई मनोऱ्याच्या बाजाराला जाईल तेथे भाजी विकेल नंतर जे पैसे येतील ते सोनाराला देऊन भरगोटीचा जोड आणील व जावयाला देईल.

२६. हळद

कोरी हलद नाही कांडाय,
हळद नाही दलाय लाल
कोरी हलद नाहीं कांडारा
नाही दलाय लाल मसरू

भावार्थ : लग्नप्रसंगी वारली लोकांना हळद आणि पॉपलिनसारख्या पातळ व लाल रंगाच्या कापडाचे महत्त्व विशेष वाटते. नवरा व नवरी यांच्या अंगाला इतक्या प्रमाणांत हळद फासली जाते की तीं दोघे पिवळ्या रंगाचीच भासूं लागतात. मर्सराईज्ड कापड नसेल तर लग्नालाच तयार न होण्याच्या हेकाही वारली तरूणांत दिसतो. त्यासंबंधी वरील गीतामध्ये एक उल्लेख आहे. हळद कांडताना स्त्रिया जे सामूहिक गीत गातात ते एकाच ओळीचे असते पण त्याचीच पुनरावृत्ती करीत ते म्हटले जाते हे त्याचे वैशिष्ट्य.

२७. विवाह-गीत (१)

होता नारन बरभा
नारन बरभेल बोलावुन आनलां
काय मांझी कामान् पडलीं
कामान् लग्नाची पडली
गेला गणोबाचे माहलालां
गणोबा देव तुरये झाला
गेला गरजायचे माहलालां
गरजाय देवी धवळेरी झाली.
नारन बरभ्यान् बोलावनां केलां,
कलका देविला बोलावनां केलां
भारजाय देविला बोलावनां केला
गंगा गवरिलां बोलावनां केला
महालखमीला बोलावना केला
हाथीं देविला बोलावना केला
तिवराय देविला बोलावना केलां
देवनी तुमालां बोलावनि केलीं
काय कामा हामची पडली
माल पडली लगनाची कामां
येवान् तुम्हीं सोन्याचे माडवा
तथ देवनी उभ्या रहजा
बोलावनां केलां हिरोबा देवान्ला,
हिरोबा धांवतुच आला
काय कामान् हामची पडलीं
माल पडली बाम्हनाची कामान्
हिरवा गेला डहाणूच्या साहराला
तथ बाम्हन् नाहीं ओ मिला

गेला सेवटे ओ साहसंला
सेवटे साहरी बाम्हन आहय
काय कामान् हामचीं पडलीं
पडलीं चोपड्यांचीं कामान्
बाहमांचा नोकर धावतुच येय
त्याहां चोपडा आनला
पडलीं पुनव्यांचीं कामान्
निघुन गेला धुडिचे मानेला
तथ पुनवा नाय मिला
निघुन गेला दुधालीं तलेला
तथ पुनवा चर
तेहां पुनवा आनला
पुनवा दुधान धवळा
टाकल्या रसमी गाद्या
पुनवा सजाया लागला
वरराजा सजाया लागला
पायीं भरल जोड
कमरें नेसल जोते र
साथी भरला आंगरखा
हाथी घेतला सोन्याचा चाबुक
चंदर सूरया जोआर लागला
टाकल उजवा पाय
उडून बसला पुनवे घोडेवर
मारला सोन्याचा चाबुक
पुनवा दपटाया लागला
पुनवा चाल लोहिचे मारगाला

आला पुनवा सोन्याचे झाप्याला
बाम्हन आला सोन्याचे मांडवाला
बाम्हनान् चोपड्या काढल्या
बाम्हन पोथ्या वांचाया लागला
लगनां अेक घड्यावर आहे
बाम्हन वाचतुच जाय
लगना आलि दोन घड्यावर

बाम्हन जुथ्या ओ बोला
चार घड्या जुथ्या बोला
दांहां घड्या लगनाच्या जुथ्या
सोला घड्या लगनाच्या आहात्
काली गांठी पांढरी वाटी,
बाम्हन बोल सावधि बोल
गणोबा देवान् तुरान् टोकली

शब्दार्थ : तिवराय् - समुद्राच्या किनाऱ्यावर वाढणारे झाड, जोते-धोतर.

भावार्थ : प्रत्यक्ष लग्नाच्या वेळी धवलेरी जे गाणे म्हणते ते हे गाणे. या गाण्यांतील भावार्थ पुढीलप्रमाणे आहे.

नारन देवाला व बरभा देवाला विवाहाकरिता बोलावणे केले व त्या समारंभाची सर्व तयारी करण्याची विनंती केली. नारनदेवाने 'गणोबा' ला वादक म्हणून बोलावले व 'गिरिजाय' ही धवलेरी म्हणून आली. नारन देवाने इतर सर्व देवांना बोलावणें केलें. त्या देवतांमध्ये चंद्र, सूर्य, महालक्ष्मी, हाथी, कालका, भारजाय इत्यादि देव व देवता होत्या.

नंतर नारनदेवाने हिरोबाला लग्नासाठी ब्राम्हण आणण्यास सांगितले. त्या ब्राम्हणाच्या शोधार्थ हिरोबा निरनिराळ्या ठिकाणी गेला आणि शेवटी एकदाचा तो ब्राम्हण सापडला. त्याच्याकडून त्याने पोथ्या आणविल्या. त्यानंतर विवाहासाठी एका घोड्याची जरूर होती म्हणून घोडा आणण्यासाठी हिरोबा जंगलात गेला; पण त्या ठिकाणी काही त्याला घोडा मिळाला नाही. शेवटी तो घोडा दुधाच्या तळ्यांत त्याला दिसला, तेव्हा हिरोबाने तो धुवून, जिन घालून आणला.नवऱ्याने आपला विवाहाच्या वेळेचा पोषाख घातला. हातात एक सोनेरी चाबूक घेतला, चंद्रसूर्याला नमस्कार केला व त्याने रिकिबीत पाय ठेवला. घोड्याला टाच मारून तो वरराज वधूच्या घराकडे निघाला. तो वर व इतर वऱ्हाडी सोन्याच्या मांडवाजवळ आले. ब्राम्हणाने पोथी काढली व तो वाचू लागला. चार घड्या झाल्या, आठ घड्या झाल्या पण लग्नाला, बत्तीस घड्या (घटका) पाहिजेत म्हणून त्या झाल्यावर ब्राम्हण म्हणाला 'सावधान' आणि गणोबाने वाद्य वाजविण्यास आरंभ केला.

२८. विवाह-गीत (२)

जा बोलाव कोन्या देवा
जा बोलाव कनसरी माता
कनसरी माता बसकाइ घोडा
तुम्ही यावे मंडप-दारा
लगनाच्या झाल्या वेळा
लनिग घटका चढाया झाल्या
जा बोलाव धरतरी माता
तुम्ही यावे मंडप-दारा
लगनाच्या झाल्या वेळा
जा बोलाव कनसरी बाल
तुम्ही बसावे जांबे घोडा
तुम्ही यावे मंडप दारा
लगनाच्या झाल्या वेळा
जा बोलाव बरम्ह देवा
जा बोलाव बरम्ह देवा
बरम्ह देवा बसकाइ घोडा
तुम्ही यावे मंडप दारा
बाम्हन् बसला जांबे घोडा
त्याने घेतला पोथ्याच्या भारा
त्याने घेतला कलस तांब्या
बाम्हन आला मांडवा खाली,
घोडा बांधला मांडवाखाली
बाम्हन बसला मंडप दारा
त्याने उघडला पोथ्याचा भारा
बाम्हन वाची पोथ्याचा भारा
माल्या मासा कोलंबी कोसा
काळी गांठी पांढरी वाटी
बाम्हन बोल सावधान
बाम्हन बोल ओपनय

शब्दार्थ : बसकाइ घोडा-घोड्यावर बसलेली, जांबे - जांभळ्या

भावार्थ : या विवाह गीतामध्ये देखील कनसरी माता, धरतरी माता, बरम्हदेव आदि देवतांना लग्नाला येण्याचे आवाहन केले आहे. ब्राम्हणाने लग्नाची कशी तयारी केली व लग्न लावले याचे वर्णन गीतामधून केल्याचे आढळते.

टीप : वारली लोकांच्या लग्नात मंत्र म्हणण्यासाठी उपाध्याची जरूर नसते. मात्र पोथी वाचणाऱ्या ब्राम्हणाचा उल्लेख धवलेरी जी गाणी म्हणते त्यात येतो.

वारली लोकांच्या गीतांचे एक वैशिष्ट्य काही ठिकाणी असें दिसते की ती गाणी सुसंबध्द विचारांनी युक्त अशी दिसत नसून भिन्न भिन्न कल्पनांचा एकत्र आविष्कार झाल्यासारखा वाटतो; व दूरान्वयाने त्यांचा अर्थ लावावा लागतो.

२९. जावाय-सुनस

माझा गे जांवांय, पुनवेचा चांदु
माझी गे सुनस, दारिची तुलस

भावार्थ : सासूला आपला जावई चांगलाच दिसतो व ती त्याला पौर्णिमेचा चंद्र आहे तर माझी सून म्हणजे घराच्या अंगणातली तुळस आहे. असे म्हणत असल्याचा भाव या गीतामध्ये आहे.

टीप : 'जांवांय' - जावई, 'सुनस'-सून. जावई या शब्दात 'व' मध्ये 'अ' चा 'आ' व सून या शब्दात 'स' अधिक मिळालेला दिसतो.

३०. कांडण

नवरा नवरी काय वो कांडय
नवरा कांडय वो पटणीच भात
नवरी कांडय वो घोड्याची लीद

भावार्थ : विहिणींनी एकमेकीच्या उखाळ्या पाखाळ्या काढणें हें काही गीतात दिसतें. या गीताचा मध्ये पुढील भावार्थ आहे एक स्त्री विचारते नवरा नवरी काय कांडत आहेत? दुसरी स्त्री उत्तर देते, ''नवरा पटणीचे भात (भाताची एक उत्तम जात) कांडीत आहे; आणि नवरी घोड्याची लीद कांडत आहे.''

३१. उंबराचे गाणें

गाजेशर देव गाजाया लागला
पाऊस पडला, उंबराचा बिया भिजला
तेहूच्या डोक्यावर उंबर उपजला
उंबर वाढाया लागला, तेल फांद्या फुटल्या
अेक गेली उगवत, अेक गेली मावळत
अेक गेली राक्षे बाजू, अेक गेली दवण बाजू
उगवत बाजूची फांदी पर्णाल आली
त्याल सुत बांधला, कोरा सेला बांधला,
त्याल सेंदूर लावला, मग ती तोडली,
सोने मांडवांत आनली, लग्नाचे कामाल आनली

शब्दार्थ - उगवत-उगवत्या दिशेला (पूर्व), मावळत - मावळत्या दिशेला (पश्चिम), राक्षे बजू - दक्षिण बाजू; दवण बाजू - दमणच्या बाजूला

भावार्थ : वारली विवाहांत उंबराच्या फांदीचे विशेष महत्त्व असतें. उंबर हे झाड अत्यंत पवित्र अशी त्यांची समजूत आहे; व ज्या वेळीं उंबराची फांदी तोडली जाते त्यावेळी उंबराला उद्देशून धवलेरी एक गाणें म्हणते. या गीतांत असें म्हटलें आहे - प्रथम पाऊस पडतो व वाऱ्याच्या झुळुकीबरोबर उंबराची वाढ होते, पानें फुटू लागतांत, एक फांदी पूर्व दिशेला वाढते, दुसरी पश्चिमेला वाढते. पूर्वेच्या बाजूची फांदी लग्नासाठी आणली आहे; त्या फांदीला सुताने बांधून कोरे कापड गुंडाळलें आहे. त्याला शेंदूर लावून नंतर ती तोडलेली आहे. कारण लग्नाच्या कामासाठी ती आणली आहे.

टीप : वारली लोकांत नवरा उंबराची फांदी तोडतो व नवरी ती स्वीकारते असा एक विधी आहे.

३२. लग्न

माझे ग दारीचा सरवरा फुल,
तेथ ग बामन अंघोल्या सार,
अंघोल्या सारून धोतीर नेस,
धोतीर नेसून पलंगी बस,
पलंगीं बसुन पोथिया वाच,
वचत वचत शेवटाला गेला
भावाचा लगीन माहा शिमग्याल

शब्दार्थ : सरवरा-झाडाचें नांव; फुल-फुलतो, अंघोल्या सारणें - अंघोळ करणे, धोतीर-धोतर; माहा-माघ.

भावार्थ : एक बहीण आपल्या भावाचे लग्न कोणत्या महिन्यात ठरलें आहे त्यासंबंधी वर्णन करीत आहे असा भावार्थ या गाण्यामध्ये आहे. माझ्या दारांतील तळे (सरवरा) फुललेले आहे. त्या ठिकाणी ब्राम्हण अंघोळ करून धोतर नेसतो. नंतर तो पलंगावर बसून पोथी वाचतो. वाचत वाचत तो शेवटपर्यंत जातो; माझ्या भावाचे लग्न माघ-शिमग्याकडे आहे.

३३. गादी

खडीक फोडून निगला अेक माड
ते ग माडाच बारीक पात
ते ग पातेच विनीला अेक गादी
ते ग गादीवर कोन बसेला
ते ग गादीवर नवरा बसेला

शब्दार्थ : खडीक - खडक, पात-पान, पातेच-पानांची, विनीला-विणली

भावार्थ : खडक फोडून माडाचे झाड उगवून आले. त्या माडाच्या लहान पानांनी एक गादी विणली. त्या गादीवर कोण बसले आहे? त्या गादीवर माझा नवरा बसला आहे. वारली भाषेत नवरोजीची चेष्टा करण्यासंबंधीची गाणी आहेत. त्यांच्या संवादातही विशेषत: स्त्रियांच्या भाषणात नवऱ्यावरून दुसऱ्या मैत्रिणीची चेष्टा करण्याची बऱ्याच वेळा दिसते.

टीप : सामान्यरूप करताना मराठीत पाते याचं 'पात्या' असं रूप आपण करतो. परंतु वारली भाषेत तसं दिसत नसून पात्याचं पातेच असं रूप दिसतं.

वारली भाषेत पुष्कळसे शब्द पुल्लिंगी दिसतात, अधिक संख्या तर निश्चित पुल्लिंगी शब्दांचीच आहे. गादी हा शब्दही पुल्लिंगी आहे हे त्यापैकीच एक उदाहरण

३४. तुझी बायकु

उलसनेवर वेलू
वेलू न कसा डूल र
निकरा वाल्या तुझी बायकु र
निजेची कसी डूल र
गिभल्या तुझी बायकु र
निजेची कसी डूल र

शब्दार्थ : उलसनेवर - वळणावरचा

भावार्थ : दोन मित्रांमध्ये चिडवाचिडवी चालली आहे. वळणावरचा वेळू जसा वाऱ्याच्या झुळूकीमुळे डुलत असतो त्याचप्रमाणे हे मित्रा तुझी बायको झोपेतही डुलत असते असा या हलक्या फुलक्या गीताचा अर्थ.

३५. नईचे कासाल...

नईचे कासाल कसई झलाल,
कसई नको मानू, कसरी झलाल;
कसरी नको मानू, नवरा झलाल,
नवरा नको मानू, बाशिंग झलाल



शब्दार्थ : नईचे-नदीचे; कासाल-कडेला, कसई-अेक प्रकारचे गवत, कसरी -भात, नको मानू किंवा मानजोस नको- पहिला पद्यांत दुसरा गद्यांत

भावार्थ : वारली स्त्रिया शेतांत काम करीत असताना एकमेकींची जी चेष्टा करितात त्याचे वर्णन वरील गीतामध्ये आहे. विशेषत: त्या चेष्टेत पतीचा उल्लेख हाच महत्त्वाचा भाग असतो. एक मैत्रिण दुसरीची चेष्टा करीत आहे. हे या गीतात दिसते.

नदीच्या कडेला काहीतरी हलल्याचा भास झाल्याबरोबर एक वारली तरूणी आपल्या मैत्रिणीला म्हणते की तिकडे कोणीतरी आहे. ती मैत्रिण उत्तर देते की धान्याचे रोप हलत असेल. ते रोप नव्हे असे पहिलीने म्हटल्यावर ती दुसरी म्हणते की तो पहिलीचा नवरा असेल. तेही नव्हे असे म्हटल्यावर दुसरी उत्तर देते की त्या नवऱ्याने बांधलेले ते बाशिंग असेल.

३६. चल जाव....

वाटेवरली आथरोनी ग, चल जाव लगनाला ग
वाटेवरली करंदी ग, चल जाव लगनाला ग
चोली माझी फाटेली ग, नाय मी येन्य् लगनाल ग
साडी माझी फाटेली ग, नाय् मी येन्य् लगनाल ग

शब्दार्थ : आथरोनी- एक प्रकारचे काटेरी झुडुप, करंदी - करवंदाची जाळी, नाय् येनूय् - येत नाही

भावार्थ : वारली लोक लग्न हा फारच मोठा आनंदाचा दिवस मानतात. मोठ्या उत्साहाने नातेवाईक दुरून त्या लग्नाला येत असतात. अशा मंगल प्रसंगी आपले कपडे चांगले पाहिजेत तरच त्या ठिकाणी जाण्यात अर्थ आहे असे स्त्रिया मानतात.

वरील गाण्यामध्ये पती पत्नीला दुसऱ्याच्या लग्नाला येण्याचा आग्रह करत आहे तर पत्नी नकार देताना अनेक कारणे सांगत आहे. वाटेवरती आथरोनी, करवंद यासारखी काटेरी झुडपे आहेत. तसेच माझी चोळी, साडी फाटलेली आहे त्यामुळे मी येत नाही.

३७. प्रित

डोंगर चढून पायरा खनल्या
तुला बिसरा घेऊन देन
कमरेची साडी धरणी पडली ।
पडली तर पडू दे । तुला मी दुसरी घेऊन देन ।।

भावार्थ : रस्त्याने जाताना कंबरेवर घेतलेले कपड्याचे ओझे पडले तरी हरकत नाही, मी दुसरे घेऊन देईन असे एक जण आपल्या पत्नीला सांगत असल्याचे वर्णन या गीतात आहे.

टीप : चढून-चढून हा शब्द व 'ढ' हे अक्षर वारली भाषेत आहे. मात्र त्याचा उच्चार मराठीप्रमाणे स्पष्ट 'ढ' असा न करता 'इ' व 'ढ' यांच्या मधला उच्चारला जातो.

धरणी-धरणीवर-विभक्ती प्रत्यय न जोडता प्रथमा हीच त्या विभक्तीचे किंवा शब्दयोगी अव्ययाचे कार्य करताना दिसते.

देन-देईन-भविष्य

विभाग ३ : शेतीविषयक गीते

३८. कुंपण



वइ केली ताराची
झापा ठेवला बेगडाचा

शब्दार्थ : वइ-कुंपण, झापा-दरवाजा, बेगडाचा-क्रॉसच्या आकाराचा

भावार्थ : आपल्या शेताचे, शेतातील पिकांचे रक्षण व्हावे म्हणून शेताला कशा प्रकारचे कुंपण असावे व दरवाजा कसा असावा याविषयीचे विचार वरील दोन ओळीतून मांडले आहेत.

३९. पाऊस

पानी करीत र गाडागुडी
बेडकी बोली र टाराटुरी
पाऊस करतु र गाजाविजी
सगल लोक नांगत उचे
तरी पाउस र नाही पडय
हातात मुठ र धरून र
हातच वडे नांगय र
तरी पाउस र नाही पडय

शब्दार्थ : गाडागुडी-रहाटावरून पाणी काढत असताना होणारा आवाज, नांगत-पहात, उचे-वर आभाळाकडे, वडे - या शब्दाचे दोन अर्थ होतात-कडे किंवा पेंडी, हातात मुठ र - भाताचे जुडगे पेरण्यासाठी हातात घेतले आहेत.

भावार्थ : वारली लोकांना पावसांचे महत्व किती वाटते याची कल्पना या गीतामध्ये दिसते. मेघांचा गडगडाट होतो. बेडक्या आवाज करू लागतात पावसाची गर्जना होते व वीजही लखलखते. साहजिकच सर्व लोक वर आकाशाकडे पाहतात. तरी पाऊस पडत नाही. हातात रोपाचा जुडगा धरून पेरण्याची ते वाट पाहतात तरी पाऊस पडत नाही. अशी एक कल्पना वारल्यांना जीवनातील अनुभवावरून सुचलेली असल्याने काव्यदृष्ट्या सुध्दा ती सुंदर वाटते.

४०. पाऊस धारा

आखरीं पानी पड र
साखरी नय निघाली
मधीच, तुंबारेली र
दोहे डोंगराचा हुडा र
मधीच तुंबारेला र
कोली हिमाला कोली र
सालेची लगीन चोळी र
झाडी हिमाला झाडी र
सालेची लगीन साडी र



शब्दार्थ : नय - नदी

भावार्थ : पाऊस पडल्यानंतर सृष्टीत होणाऱ्या बदलाचे वर्णन या गीतातून केले आहे.

लोक वाट पाहून पाहून कंटाळले म्हणजे शेवटी पाऊस पडतो; नदी पाण्याने भरून वाहू लागते. मध्येच पाणी साठते व दोन डोंगरांच्या दरीतील सखल भाग तुडुंब भरून जातो.

४१. वनसय (१)

बारडाचा खोरा
खोरा कोणे गाजवेला
भगताचे पोरे नी र
खोरा न गाजवेला र
वनसयला जायाला र
दिवाल दसरीला र
वनसय उधट झाली र
चैतरी वसाखाला र
वनसय दपीत झाली र

भावार्थ : बारडाची दरी कोणी गाजवली? ती भगताच्या पोरांनी गाजवली. खोरा जर गाजवला नाही तर वनस्पती नाहीशा होतील दिवाळी व दसऱ्याला वनस्पती उगवतात व त्या चैत्र वैशाखात दिसेनाश्या होतात.

वनस्पती केव्हा वाढते व केव्हा लुप्त होते यासंबंधी हे विवेचन आहे.

४२. वालाचें गाणे

बावीच्या काठीं वरवा लावीयेला,
पानेरे बाई वरवा शीपी ये जो,
गोवारी दादा वरवा चढवी जो,
वाऱ्याच्या झल की वरवा मोडीयेला

शब्दार्थ : गोवारी - गुराखी, वरवा-वाल, पानेरे-पाहुणी, शीपी-पाणी शिंपले, झलकी-झुळूक.

भावार्थ : वालपापडी किंवा घेवडा हा मोठ्या प्रमाणात शेतात लावला जातो, त्यासंबंधीचे वर्णन या गीतात आहे. विहिरीच्या काठी वरवा (घेवडा) लावला. पाणी शिंपणाऱ्या बाईने पाणी दिले, गोवारी म्हणजे गुराख्याने तो वर चढविला पण वाऱ्याच्या झुळुकीने तो तुटून खाली पडला.

४३. रहाटाचें गाणें

बैल कुं कुं राटाला
पानी गेला चरनीला
चरनीचा पानी ग येवंदे
तुमी नागोलि बनाल
नागोलीचे नागोले येवंदे
तुमी देवाचे लगनाला
चरनीचा पानी ग येवंदे

तुमी नारोलि बनाल
नारलिचे नारेल ग येवंदे
तुमी देवाचे लगनाल
चरनीचा पानी ग येंवदे
तुमी हलदि बनाल
हलदिचे हलद ग येंवदे
तुमी देवाचे लगनाल

शब्दार्थ : राटाला-रहाटाला, चरनी-बाग, येंव दे - येऊ दे, नागोली-नागवेल, नारोली-नारळ.

भावार्थ : हे रहाटाचे गाणे आहे. बैल पाणी ओढीत असतात आणि रहाटाचा कुई कुई असा आवाज होत असतो. पाटाचे पाणी येऊ दे व नागवेलीला पानें येऊं देत. नारळीच्या झाडाला नारळ येवोत, हळदीच्या रोपाला हळद येऊं दे व त्या सर्वांचा उपयोग देवाच्या लग्नासाठी व्हावा असें त्यात म्हटले आहे.

टीप : पानी गेला - असा शब्द प्रयोग या ठिकाणी आहे. यावरून 'पानी' हा शब्द वारली भाषेत पुल्लिंगी आहे हे स्पष्ट होते.

४४. कुऱ्हाडीचे गाणें

कुराडी घेव रे राज कुराडी घेव
तोडी तूं जाव रे राजा तोडी तूं जाव
पारखना पारख तूं राजा पारखन: पारख
सागली सोट र राजा सागली सोट
खांडना खोड र राजा खांडना खोड
गाडी तूं भर र राजा गाडी तूं भर

मारगीं नेवं र राजा मारगी नेव
बंदरी नेव र राजा बंदरी नेव
तोल ना तोल र राजा तोल ना तोल
किंमतु कर ना राजा किंमतु कर
शंभर रूपय राजा शंभर रूपय

शब्दार्थ : खांड ना-तोड ना, खोड-बुंधा, मारगीं -रस्त्यांत, किंमतु-किंमत (ज्ञानेश्वरीतील उकारान्त शब्दासारखा)

भावार्थ : शेतीतील लाकडें बाजारांत विकून पैसा कसा आणला याविषयी विवेचन या गीतामध्ये आहे. चांगले लाकूड परखावे, सागलीचा सोट निवडावा त्याचे तुकडे करावे, गाडी भरून ती बाजारात न्यावी व नीट वजन करून त्याचे शंभर रूपये आणल्याबद्दलचे वर्णन या गीतात आहे.

टीप : कुऱ्हाडीला वारली लोकात विशेष महत्व आहे, कारण जंगलातील लाकडे तोडण्याला तेच साधन त्यांना विशेष उपयोगी पडते. सैनिकाला जशी तलवार तशी वारल्याला कुऱ्हाड. म्हणूनच स्वतंत्र गाणे रचण्याइतके महत्व तिला देणे साहजिकच आहे. शिवाय मनात जशा भावना आल्या तशा सरळ स्वरूपात मांडणे हे वारली काव्याचे लक्षण दिसते. एक एक गाणे तास तासभर ते गाऊ शकतात व त्या नादातच ते कामाचे श्रम विसरताना दिसतात.



रामजी भंडारी

खजुरीवर चढे तो कोन रे भंडारी
खजुरीवर चढे तो रामजी भंडारी
ताडी काढी छेदई तो रामजी भंडारी
ताडीवाले रे रामजी भंडारी
ताडीवाले रे महादू भंडारी

शब्दार्थ : चढे-चढतो, छेदई-छेदतो-तोडतो.

भावार्थ : दारूबंदी होण्यापूर्वी वारली लोक ताडी पीत असत. खजुरीच्या झाडावर भंडारी लोकांनी मडकी लावावी व त्यात ताडी जमा करावी हे दृश्य वारल्यांच्या नित्य परिचयाचे होते. वरील गीतामध्ये अशाच एका रामजी भंडाऱ्याचे वर्णन आहे.

४६. खळ्यावरील गाणें

साया कुनबी, माया कुनबी
आता माझा भोयार कुनबी
होता माझा सोन्या कुनबी
साया कुनबी माया कुनबी
दोघं सख्ख भावोली
कसा कमायचा धेन कराया लागल
सोने मालवटी चढाया लागला
पैसा संग बांधला शेवाला
निगून गेला शेवटी सहराल
लोहाराचे घरी गेला र लोहाराचे घरी
लोहारी दादा कोयता करुन दी जो
कोयता करुन दिला पैसा दिला
कोयता घेऊन आला जी जो
निगून गेला खनगर डोंगराल
कुराडील डांड खांडल, कोयताल धरुन कापल
घेऊन आला डांड, घडून बसवला कुराडिल
सकाळच्या पहराला सातशे कामकऱ्याल हाका मारल
काट खांडत आहा गोहो, बायका कवळते
बीजे दिस उठली, राव भराया लागला
राब बनावल ग जी राब बनावल
राब सुकून गेला, डहाळ काढला
बीजे दिस उठली, माटी भाराया लागली

कशी भारून आली, बीजे दिस पेटून दील्ही
जेठ महिना निगून आला, कुस पाहिजेत
हलशी खाडल्या, पाटी खांडली, चवडा खांडलाय
पानी पडाय लागला, भात पाडलं, पटणीच भात
कुड्याच भात, अजग अद्दर पेरल
पेरून आला, दोन दिस तीन दिस झाल,
उगून आल, वाडाया लागल, दोन पानं झाली
तीन पान झार्ली, चार पान झाली
आठ पान झार्ली, पुरा ग झाला
सकालच्या पारीं हाका मारल्या
चला जाऊ आवाया, राबून राब खनल
कसा एक महिना गेला, रान वाढून आला
निंदाया आली, पोटरा आली आली,
चार पाच दिस झालं, निस्वान पडली
दहे बारा दिसाला ओजून गेली
कसा सांगा पिकून आला, कापाया लावला
सुकून भात गेलं, सागाचं पान आनल
उडवी केली, अस ढीग केलं
ओक महिना झाला, मला 'ग' लावला
असा भात झोडत आहा, असा झोडत आहा
भात वाढवाया लागला, पाली भराया लागल
घरामदे पाली भरून ठेवली, भरून ठेवली

शब्दार्थ : साया-माया - कुणब्यांची नावे, भोयार-नाव, भावोली-भाऊ, कमायचा-मिळकत करायची, धेन-ध्यान, विचार; मालवटी-माळ्यावर , संग-बरोबर, शेवाला-पदराला, सहराल-शहराला, खनगर-डोंगराचें नांव, डांड-दांडा, कोयताल-कोयतीला, धरू-मूठ, पहराल-प्रहराला, काट खाडणे-बारिक फांद्या कापणे, गोहो-पुरूष, कवळते-ढीग करतात, बीजे - दुसऱ्या, माटी-माती, भाराया-दडपण्याला, जेठ-जेष्ठ, कुस-नांगर. हलशी-हलिसुम म्हणजे लांब दांडी, पाटी-चवडा ज्यांत बसविला जातो त्याला पाटी म्हणतात, चवडा-ज्यात 'फाळ' बसवितात त्याला चवडा म्हणतात, पटणी-भाताची एक जात, कुड्याच-भाताची एक जात, अजग-सर्व, अदरं-राब, आवाया-रोपण्यासाठीं, पोटरा आली-गर्भावस्थेंत आली, निस्वान पडली-निसवली-प्रसवली-भात बाहेर पडलं, ओजून गेली-पक्व झाली, उडवी केली-ढीग केले, मला लावला-मळणी केली, वाढवाया-कापण्याकरिता (गुजराती) वाढवाया म्हणजे भात सुपांतून उडविण्याकरिता या अर्थी वारली हा शब्द वापरतात, पाली-कणगे.

भावार्थ : खळ्यावर केलेल्या जाणाऱ्या कामांचे अथपासून इतिपर्यंत विवेचन या गीतामध्ये आहे. मुख्य मुद्यांना स्पर्श करीत, दोन भावांनी कशी शेती केली, याचे एक धावते चित्र त्यांत आहे. त्यात साया कुळंबी आणि माया कुळंबी हे दोघे भाऊ होते; आपण एकंदर काम कसे करावयाचे याचा ते विचार करू लागले. गाठी जो पैसा होता तो घेऊन ते शहराला गेले. लोहाराकडून त्यांनी कोयता करून घेतला; कुऱ्हाडीसाठी व कोयत्यासाठी दांडा कापून आणला. सातशे कामकऱ्यांना बोलावून आणले, बायका पुरूष एकत्र काम करू लागले.

डहाळ व इतर वस्तूंनी राब भरली, नंतर दुसरे दिवशी माती भरली. पुढे तो ढीग पेटविला. नांगरांचा फाळ, लोखंडी आडवी पट्टी, दांडी इत्यादी तयार केल्या; नंतर पाऊस पडायला लागला. शेतात पटणी, कुड्याचे भात इत्यादि निरनिराळ्या प्रकारचे भात पेरले. दिवस जसजसे जाऊ लागले तसतशी पाने वाढू लागली नंतर पुन्हा कामकऱ्यांना बोलावलें, शेतातील कचरा काढला. कणसें बाहेर पडूं लागली. काही दिवसांनी ती पक्व झाली. भात सुकल्यावर उडवी केली (रचून ठेवले) नंतर ते झोडून काढले, साफ केले व घरात भरून ठेवले.

टीप : भात तयार झाल्यानंतर ते कापून खळ्याजवळ आणून ठेवतात व खळ्यावर बैलांच्या पायाखाली तुडवून त्यातून धान्याच्या रूपाने तयार झालेले भात-ढीग करून ठेवतात. वारली लोक खळ्याला फारच महत्व देतात. विटाळशी स्त्रीला त्या खळ्याच्या आसपास फिरकू सुध्दा देत नाहीत. धान्य काढण्यापूर्वी खळ्याची पूजा घरातील कर्ता वारली करतो. त्या दिवशी तो उपवास करतो. अस्तमान झाल्यावरच तो खळ्यातील धान्य मापतो.

४७. कामकरी बायकांचे गाणें

दोगी तिगी बहिनी आमी खानी पारखाया गेल्या गो जी
दोगी तिगी बहिनी आमी माटी खनाया गेल्या गो जी
दोगी तिगी बहिनी आमी माटी वहाया गेल्या गो जी
दोगी तिगी बहिनी आमी जातरा थापाया गेल्या गो जी
दोगी तिगी बहिनी आमी कोदरी भरडाया गेल्या गो जी
दोगी तिगी बहिनी आमी कोदरी फुनाया गेल्या गो जी
दोगी तिगी बहिनी आमी कोदरी सडाया. गेल्या गो जी
दोगी तिगी बहिनी आमी कोदरी धुवाया गेल्या गो जी
दोगी तिगी बहिनी आमी कोदरी रांधाया गेल्या गो जी
दोगी तिगी बहिनी आमी कोदरी जेवाया गेल्या गो जी

शब्दार्थ : दोगी-दोघी, तिगी-तिघी, खानी-खाणी-खड्डा, पारखाया-पाहाण्यास, माटी-माती, जातरां-जातें, कोदरी-धान्य, फुनाया-पाखडण्यासं, रांधाया-शिजविण्यास

भावार्थ : वारली स्त्रिया शेतीच्या कामांत, पुरूषांच्या बरोबरीने काम करितात. या स्त्रिया, आपण कोणते काम करितो, याविषयी सर्व माहिती देतांना दिसतात. त्या म्हणतात की आम्ही माती खणतों, ती वाहून नेतों, जातें थापुन तयार करतों (वारली ज्या जात्यावर भात भरडतात ते भल्या मोठ्या आकाराचे असतें व तें मातीचेंच बनविलें असतें) त्या जात्यावर कोदरा (एका प्रकारचे धान्य) भरडतों, आम्ही ते सडतों नंतर आम्ही तें धुवून त्यापासून भात तयार करण्यापर्यंत सर्व कामें करतों.



विभाग ४ : इतर गीते

४८. अंगाईगीत

चिकट मातीच चोपडे ओटे
चोपडे ओटील बारा खोल
बारा ग खोलाल अेकली नार
अेकले नारील अेकला बालु
अेकले बालाल पानी ग ताव
पानी ग तावून आंगोल सार
कोरे ग शेलेखाल तोंड ग पूस
कोरे ग शिंपेखाल दूध ग पाज
केलीचे खांबाल झोली ग बांध
वाहाती वान्या ग झोली हिंदोल
कोकत्री बाई ग पान खराडव
घुंगरी बाई ग गीत गाव



शब्दार्थ : चोपडे ओटे - चिकट ओसरी, खोल-खोल्या, ताव-तापीव, आंगोर सार-अंघोळ घाल, शेलेखाल-शेल्यानें खाल हा तृतीयेच्या अत्ययासारखा वापरलेला आढळतो, कोकत्री-अेक प्रकारचे पाखरू, खराडव-खरडून आवाज कर, घुगरी-पक्ष्याचे नाव

भावार्थ : 'अंगाईगीत' ज्याला म्हणता येईल तशा स्वरूपाचे हे गीत आहे. त्यातील कल्पना पुढीलप्रमाणे आहे. चिकण मातीचा भिंती असलेल्या बारा खोल्याचे एक घर आहे त्या घरात एकच स्त्री वास करते. तिला एकच मूल आहे. त्या मुलाला पाणी तापवून अंघोळ घाल. स्वच्छ कपड्याने त्याला पूस. चांगल्या शिपेतून त्याला दूध पाज. केळीच्या खांबाना एक झोळी बांध. हेवाचा त्या झोळीला झोका दे हे घुंगेरी (गांधील माशीच्या जातीची गुणगुणणारी एक माशी) तू त्या लहान बालकासाठी गीत म्हण.

टीप : खोली या अर्थी वारली भाषेत 'खोल' असा शब्द दिसतो. व त्याचे बहुवचन 'ल' या अक्षरावर फक्त जोर देऊन होत असे दिसते. मराठी भाषेत 'माप' हा अशा प्रकारचा शब्द आहे.

'खाल' हा प्रत्यय तृतीयेच्या 'ने' या प्रत्ययासारखा वापरतात व 'शेलेखाल' याचा अर्थ शेल्याने असा करतात. दुसरीही गोष्ट लक्षात ठेवण्याजोगी आहे ती म्हणजे मराठीत प्रत्यय लावताना आपण जे सामान्यरुप करतो त्यावेळी मूळ शब्दात बदल करतो. उदाहरणार्थ शेला याचे 'शेल्या'. परंतु वारली भाषेत तसा फरक नेहमी होतोच असे नाही हे 'शेलेखाल' या शब्दावरून दिसून येतो.

४९. सर्पाची मुलगी

काल्या नागाची पोयरी ग
जोडवी विसरेली ग
सांग साडी न विसरेली ग
सांग चोली न विसरेली ग
साली चूडे न विसरेली ग
सांग हारा न विसरेली ग
बोतवान न विसरेली ग

शब्दार्थ : पोयरी - मुलगी

भावार्थ : वारली लोकांत 'देव' समारंभ म्हणून जो आहे त्याच्या शेवटी तरूण व तरूणी नारन देवाला संतुष्ट करण्यासाठी गाणी म्हणतात ही गाणी अर्थातच अतिशय लहान असतात. पुरूष पहिली ओळ म्हणतात व तिचीच पुनरावृत्ती स्त्रिया करतात, यापैकी पुष्कळशा गाण्यांत एकाच विषयावरची विचार मालिका नसते. काही ठिकाणी तर गाण्यांतील अर्थाचा स्पष्ट बोध होत नाही. उदाहरणार्थ वरील गीतामध्ये असें म्हटले आहे की काळ्या नागाची मुलगी जोडवी विसरली आहे. साडी विसरली आहे, बांगड्या विसरली आहे व हारही विसरली आहे.

टीप : या गीतामध्ये 'न' किंवा 'ग' हे पादपूरणार्थकासारखे आले आहेत.

५०. मोती

नईचे धूलवडे वावील वारा
बाईचे साडेवर टीकेचा मोती
बाईचे चोलेवर टीकेचा मोती
बाईचे हारेवर टीकेचा मोती

शब्दार्थ : नईचे-नदीचे, धूलवडे-धुळीचे कण, वावील-उडवील, चोलेवर-चोळीवर

भावार्थ : या गीतातून एक सुंदर कल्पना व्यक्त केली आहे. नदीच्या वाऱ्याने काठावरील धुळीचे कण उडविले व त्यामुळें तेथें असलेल्या त्या बाईच्या साडीवर, चोळीवर व हारावर मोत्याप्रमाणे ते कण शोभूं लागले.

ही कविता वारली लोकातही काहींची प्रतिभा असामान्य कल्पना करण्यास कशी समर्थ आहे हे दर्शविते.

टीप : साडेवर, चोलेवर - हे शब्द षष्ठीचा प्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय जोडताना सामान्य रूप कसे तयार होते याचे स्पष्ट विवेचन करतात.

५१. परिमल

बंदरी तारू आला
बंदरीं परमल सुटला



शब्दार्थ : परमल-सुवास

भावार्थ : वारली आणि मासेमारी यांचे अतूट असे नाते आहे. मासे हे या लोकांचे आवडते खाद्य. समुद्रकिनाऱ्याजवळ त्या निमित्ताने ते येतात. बंदरात तारू आले असल्याने सगळीकडे माशांचा सुवास सुटला आहे असा भाव या गीतातून व्यक्त केला आहे.

५२. पाखराचे गाणें

चरत पाखरू तान्हेल
जान पडल दरे मेरे
दरे बोल दरे बोल
एकेल तुल बुडवील
पाखरूं बोले एके घोटत
एके घोटत आटवीन तुल

शब्दार्थ : चरत-हिंडणारे, जान-जाऊन, दरे-दर्या, मेरे-कडेला, घोटत-घोटांत, तुल-तुला

भावार्थ : तहानेने व्याकूळ झालेलें एक लहान पाखरू व खूप दूरवर पसरलेला सागर यांचा हा संवाद आहे. समुद्र त्या पाखराला म्हणाला, ''माझी एक लाट तुला बुडवील''. पण ते लहान पाखरूं तितक्याच स्वाभिमानाने म्हणालं, ''एका घोटात मी तुला आटवीन.'' समुद्राच्या काठाने आवाज काढित भिरभिर फिरणाऱ्या पक्ष्याच्या ओरडण्यात वरील अर्थ कदाचित असेल अशी कल्पना वारल्यांच्या गीतांतही दिसते असें म्हणावें लागतें.

टीप : चरत पाखरू चर-(सं) हिंडणे या अर्थाचा शब्द वारली भाषेमध्ये दिसतो. संस्कृतमधील समान अर्थ असलेले जे काही शब्द वारली भाषेत आहेत त्यापैकी हा एक आहे.

जान-जाऊन, सोपी भाषा होण्याकडे व उच्चारात अधिकाधिक काटछाट करण्याकडे प्रत्येक भाषेत प्रयत्न झालेला दिसतो.

'जात आहे' याबद्दल 'जातोय्' हे जसे रूप बोली मराठी भाषेत आज पुष्कळ अंशी येऊ लागले आहे व क्वचित लिखाणातही डोकावू लागल्यामुळे काही वर्षांनी रूढही होण्याची शक्यता आहे तीच अवस्था 'जान' या शब्दाच्या बाबतीत दिसते.

५३. कोकत्री

उंबराचे ढोलींत कोकत्री बबडी
पान्याल हाक रे मा रे रे
धरतरी शोषेली रे
माझी कनसरी कोमेली रे
त्याच्या भाताचा शिरण रे

शब्दार्थ : बबडी-बोलली, कोकत्री-एका पक्ष्याचे नाव, शोषेली-वाळलेली, कनसरी-धान्य देवता, कोमेली-कोमेजलेली, शिरण-फुटणे

भावार्थ : धरित्री तहानलेली आहे व धान्यदेवता कोमेजली आहे म्हणून उंबराच्या ढोलीत कोकत्री (एका पक्ष्याचें नाव; हा पक्षी ओरडूं लागला की, पाऊस पडण्याची ती पूर्वचिन्हे आहेत अशी वारली लोकांची समजूत आहे.) पर्जन्याला हाक मारीत आहे असा विचार व्यक्त केला आहे.

५४. वनसय (२)

साले मुसलि डोंगराला ग,
माझी वाट कोन्हा चोखलेली ग
वाट कोन्हा चोखलेली ग,
भगताच्या पोयन्यान् ग
भगताच्या पोयन्यान् ग, वंसया काढाया ग
वंसया काढाया ग, माझ्या सालेल देयाल ग
सालेला देयाल ग, पोरांनां होयाला ग

शब्दार्थ : साले मुसली-डोंगरांचे नाव, चोखलेली - स्वच्छ केली, वंसया-वनस्पती, सालेल - मेहुणीला, पोरांना होयाला - तिला मुले होण्यासाठी

भावार्थ : भगताच्या मुलाने डोंगरावरची वाट साफ कां केली त्याचें कारण या गीतातून सांगितलेलें आहे. त्या डोंगरावर असलेल्या वनस्पती काढण्याची त्याची इच्छा आहे. कारण त्या वनस्पतीमुळे स्त्रीला मुले होतात अशी शक्ती त्या वनस्पतींत आहे.

७५. नाच

अथंय नाचू का कोठय नाचू
माझ्या धरतरीचे पाठीवर
धरतरी माझी माय रे, पाय रे कसा लावय रे
अथ नाचू का कोठं नाचू
माझ्या कनसरीचे बलावर
माझ्या गावतरीचे पाठीवर
माझ्या नंदीबैलाचे पाठीवर
नंदीबैलाची पाठ र, महादेवाची वाट र
नंदी बैलाची शेपट, पितलेचे दोन घोस रे
नंदी बैलाच खांद र, पुनवेचा चांद र
नंदी बैलाची शिंग र, महादेवाची लिंग र
नंदी बैलाचे कपाळीं, महादेवाचा लेपा र
नंदी बैल आला दारी, चिखल भारी र

भावार्थ : या गीतामध्ये एक वारली मनुष्य नाच कोठे करावा हा विवंचनेत पडल्याचे दृश्य आहे. जमिनीवर नाचावे म्हटलें तर धरित्री ही माता असल्याने तिला पाय कसा लावायचा हा प्रश्न त्रास देतो. गाय किंवा बैल यांच्या पाठीवर नाचायचे म्हटलें तर नंदीबैलाची पाठ ही महादेवाची वाट आहे म्हणून ते शक्य नाही.

७६. दिवा

ओटीला दिवा, ओहरीला चांदण पडय ।
पेटारी पिपल गगनांत जाय ।
वाडीवर दिवा, आंगण्यात चांदण रें ।
आंगणे दिवा ओटीवर चांदण पडय ।
ओसरी दिवा आंगणे चांदण पडय ।

शब्दार्थ : ओहरी - ओसरी

भावार्थ : या गीतातून दिव्याचे महत्व विषद केले आहे. ओटीवर लावलेल्या दिव्यामुळे अंगणात चांदण्यासारखा प्रकाश पडला आहे असे वर्णन केले आहे.

५७. गवारी

डोंगरामंदि गवारी गुरं चारतो
तिकुन कोन आला, त्याला ओलखलं नायकांनी
नागोलीच पान मांडवाखाल
अेखली मी खाली नाय यायची
सवासीन दोगी पाहिजेत

शब्दार्थ : खाल-खाली, तिकुन-तिकडून

भावार्थ : या गीताचा असा भावार्थ आहे की डोंगरामध्ये गुराखी गुरे राखीत आहे; इतक्यांत तिकडून कोणीतरी आला व त्याला नायकांनी ओळखले

टीप : मदि-मध्ये - आपल्याकडील कुणबाऊ भाषेत जसा 'मदि' हा 'मध्ये' या अर्थी शब्द आहे. तसाच वारली भाषेतही दिसतो. एखली-एकली-एकादा याचा मराठीत पुष्कळ वेळा एखादा असा पर्याय उच्चारताना दिसतो तसा प्रकार येथे झालेला आहे.

५८. गजरा



अेक आना घेऊन गजरा मला बनावून दे
दोन आना घेऊन गजरा मला बनावून दे
तीन आना घेऊन गजरा मला बनावून दे

भावार्थ : वारली तरूणींना डोक्यांत रंगीबेरंगी फुले घालण्याची फार हौस असते. जंगलात वाढणारी निरनिराळ्या रंगाची वासहीन फुलें त्या मुद्दाम खुडून आणतात. अशा फुलांचा गजरा एक आण्याला, नाही तर दोन आण्यांना, निदान तीन आण्यांना तरी माळ्यांने द्यावा असे एक वारली तरूणी या गीतामध्ये म्हणतांना दिसते.

टीप : बनावून - बनवून (मराठी) विशिष्ट रूप/दोन आणा - दोन आणे (आना हा शब्द हिंदीप्रमाणे बहुवचनी वापरलेला दिसतो.)

५९. बाजार

चल ग बने बाजाराला
चल ग बने लगीन जोडवी
नाच ग बने मोडामोडी

शब्दार्थ : मोडामोडी - एक प्रकारचे नृत्य

भावार्थ : एक तरूणी लग्न प्रसंगासाठी जोडवी आणण्याकरिता आपल्या मैत्रिणीला बाजाराला चल असे सांगत आहे.

६०. चोरी

बोहरी खालची चोरी ग चोरी
काय काय चोरें नेलं ग नेलं
जोडवी चोरें नेली ग नेली
साडी चोरे नेली ग नेली
चोली चोरें नेली ग नेली
गांठी चोरे नेली ग नेली

शब्दार्थ : बोहरी-बोरीचे झाड

भावार्थ : प्रवास करीत असताना वारली लोकांनी रात्रीच्या वेळी एखाद्या झाडाखाली विसावा घेण्याची पाळी येते. अशाच एका प्रवासात बोरीच्या झाडाखाली विश्रांती घेत असताना रात्रीच्या वेळी जी चोरी झाली त्यामुळे आपली सर्व चीजवस्तु गेल्याची हकीकत या गीतामधून एक स्त्री सांगत आहे.

टीप : चोरी हा शब्द च् व स् यांच्यामधील उच्चारला जातो.
चोली - ळ बद्दल ल, चोरे - 'चोर' या शब्दाची तृतीया

६१. तमासा

कवाडगावाला तमास केला समोर गलीला
झरी गावाला तमासा केला समोर गलीला
करज गावाला तमासा केला समोर गलीला
राधी आली धींरि बोलते साहेबा सलाम रे साहेबा सलाम ।
राधी आली धींरि बोलते पोलिसा सलाम रे पोलिसा सलाम ।
राधी आली धींरि बोलते, मुसला सलाम रे मुसला सलाम ।
राधी आली धींरि बोलते पारशी सलाम रे पारशी सलाम ।।

शब्दार्थ : राधी - नृत्य करणारी

भावार्थ : या गीतामध्ये 'तमासा' हा शब्द आला आहे. खेड्यात जो तमाशा चालतो त्याचा परिणाम या अलिकडच्या वारली तरूणांवर झाला असण्याची शक्यता या गीतावरून दिसते. त्या गीतांत ज्यांना 'सलाम' केला आहे ते म्हणजे 'साहेब, पोलिस' इत्यादि आहेत.

६२. गरदी

कवाड गावाला वारली लोकांची गरदी झाली जी जी जी
झरी गावाला धोडी लोकांची गरवी झाली जी जी जी
संजाण गावाला मुसले लोकांची गरदी झाली जी जी जी
उमरगावाला शेटे लोकांची गरदी झाली जी जी जी
रेवजी गावाला भय्ये लोकांची गरदी झाली जी जी जी
बोर्डीगावाला वाडतळ लोकांची गरदी झाली जी जी जी

शब्दार्थ : शेटे - शेटजी, घोडी - एका जातीचे नाव, सजन - संजाण गाव. हे एक बंदर असून पारशी लोक येथे येऊन प्रथम उतरले असे म्हणतात. संजाणजवळ पारशी लोकांनी उभारलेला एक स्तंभ आहे., उमरगाव - उंबरगाव, उंबरगावापासून संजाण सहामैल उत्तरेला आहे. बोर्डी हे गाव दक्षिणेला सहा मैल आहे.

भावार्थ : कवाडगावाला वारली फार आहेत. झरा गावाला धोडी लोक पुष्कळ आहेत. सजन (संजाण बंदर) गावात मुसलमान बरेच आहेत, उंबरगावाला शेटसावकार आहेत, रेवजी गावाला 'भय्ये' लोक अनेक आहेत आणि बोर्डीला 'वाडनळ' (वाडीवाले, किंवा आपल्याकडील भाषेत माळी) लोक आहेत असे प्रत्येक गावाचे वैशिष्ट्य सांगणारे वर्णन वरील गीतामध्ये आहे.

वारली जमात

१८७२ साली झालेल्या खानेसुमारीप्रमाणे ठाणें जिल्ह्यात आदिवासी म्हणता येईल अशा नऊ जमाती होत्या. त्यांची नावे

आग्री, कोळी, वारली, ठाकूर, कातकरी, दुबळा, वैती, कोकणा व धोडिया.

डॉ. विल्सन यांच्या मताप्रमाणें वारली हे कोकणचे जे सात भाग होते त्यांपैकी 'वरालत' या भागांत राहणारे असावे असे आहे.

डॉ. विल्सन यांनी "Aboriginal Tribes II' या पुस्तकांत कोकणचे पुढील सात भाग सांगितले आहेत.

केरळ, तुलव, गोवराष्ट्र, कोंकण (खुद्द), केराहट, वरालत व बर्बर.

वराल - याचा अर्थ डॉ. विल्सन यांच्या मताप्रमाणें जमिनीचा नांगरलेला भाग असा आहे.

श्री. राजवाडे यांच्या मताप्रमाणें वारली हे कात्यायनानें आपल्या वार्तिकांत वरूड या नांवानें जे अनार्य दर्शविले आहेत ते आहेत असें आहे. (महिकावतीची बखर १९२४, पान ८२)

वरूड-वरूडकी-वरूलाई-वारुली-वारली अशी ते व्युत्पत्ति देतात.

एन्थोव्हेन (Enthoven) ("Tribes and Castes of Bombay Presidency Vol. I p. 156)

या ठिकाणीं म्हणतो कीं वारली हे भिल्लां पैकीच आहेत. वारली लोकांपैकी काही सांगतात की ते जंगली मुलुखात भात तयार करण्यापूर्वी जमीन भाजण्यासाठी 'वारल' नांवाचे इंधन पसरतात म्हणून त्यांना वारली म्हणतात.

काही वारली आपल्याला अत्यंत कमी प्रतीचे समजतात.

''आम्हाला करून देवाने पीडा वारून टाकली, म्हनुन वारली'' अशीहि उत्पत्ति कांही वारली आपल्या स्वत:बद्दल देतात.

काही वारली अत्यंत रानटी अवस्थेत राहतात व ते कोल्ह्याचे सुद्धा मांस खातात म्हणून त्यांना 'कोलखादें' म्हणतात.

वारली शेतकऱ्यांची घरें ज्या साधनानें बांधली जातात त्यांना 'बोरू' किंवा 'कर्वी' असे म्हणतात.

शेतांत जे पीक येतें त्याला नागली, कोद्रा, वरी, उडीद, तूर, चवली अशी संज्ञा आहे.

१८८२ च्या बॉंबे गॅझेटियरमध्ये वारल्यांचे तीन विभाग केले आहेत.

मुरडे, दावर आणि निहिर. पहिल्या दोन विभागांमध्ये रोटीबेटी व्यवहार होऊ शकतात, मात्र तिसऱ्याशी नाही.

"They are Murdes, Davars and Nihirs. First and second interdine and intermarry, but not with the third."

एन्थोव्हेनच्या मताप्रमाणे आणखी एक त्यांचा विभाग आहे. तो म्हणजे Pure किंवा शुद्ध. या चारी जाती ऐकमेकांत रोटी व बेटी व्यवहार करीत नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे.

''मुरडे'' हे नांव पडले कारण ते उत्तरेकडे राहतात व त्यांच्या बायका 'मुरडन्या' नावाचे अलंकार घालतात. हे ठाणे जिल्ह्यात सापडत नाहीत.

'दावर' स्त्रिया त्यांच्या पितळी कांकणासाठी प्रसिद्ध आहेत. हात व पाय भरपूर कांकणांनी त्या झाकून टाकतात. ठाणे विभागाच्या अगदी उत्तरेला हे राहतात. दावरांच्या दक्षिणेकडे 'निहिर' राहतात, व त्यांचा मराठे कुणबी यांच्याशी विशेष संबंध आलेला दिसतो.

मराठीमध्ये 'नाही' या शब्दाऐवजी ते 'निही' हा शब्द ते वापरतात म्हणून त्यांना 'निहिर' अशी संज्ञा आहे असा समज आहे.

मोखाडा विभागांतील वारली आपल्याला 'शुद्' म्हणजे शुद्ध मानतात व त्यांनाच 'घाटी वारली' अशीही संज्ञा आहे.

यांच्यापैकी अमुकच विभाग शुद्ध म्हणणे कठिण आहे. तसेच हे विभाग स्वभावत: किंवा भौगोलिकही वाटत नाहीत

कारण 'दावर' वारली 'निहिर' वारल्यांच्या विभागांत काही दिवस राहिला तर तो त्यातलाच होतो.

आणखी एक विभाग (शुद्धचाच भाग) म्हणजे 'पठार' वारली असे स्वत:ला म्हणवून घेणारे आहेत.

वारली जातीत जी आडनावे आहेत त्यांची संख्या त्यांच्या व्यक्तिगत नावांपेक्षा अधिक आहे.

आडगा - (आड म्हणजे काठी - त्यावरून शिकार नेतात म्हणून आडगा अशी उपपत्ति ते वारली आपल्या नावाची देतात)

बरफ, बीज, घाटाल, गवत्या, हांडवा, गोताई, टोकऱ्या, (टोकर म्हणजे बांबू) थालेकर (थाली वाजविणारे) थाली, तांडेल (तांडा म्हणजे जनावरांचा समुदाय) हाडल (हाड म्हणजे केवळ हाडे व मांस घेणारे) गवली, नगाऱ्या इत्यादि.

त्यांची नावे नेहमी आडनावांसह घेतली जातात. उदाहरणार्थ, रामा आडगा, रामा खरपड्या, अशीं

वारली लोकांत भावर हें जें आडनाव आहे. ते खानदेशमधील भिल्ल जमातीत भावरे यांच्याशी साम्य दर्शविणारे आहे.

हे प्रत्येक आडनाव म्हणजे एक स्वतंत्र 'कुल' असे ते मानतात. प्रत्येक कुलातील इसम आपल्याला 'कुटबी' म्हणजे (कुटुंब) त्या कुटुंबातील असे समजतो.

वारली लोकांची भाषा

एकोणिसाव्या शतकातल्या ज्या अभ्यासकांनी खास वारलींच्या संदर्भात लिखाण केले आहे अगर इतर जमातींच्या बाबतीत लिहिले आहे त्यांनी वारली भाषा ही मराठीच असल्याचे म्हणले आहे.

(Nineteenth century scholars who wrote on the Warlis exclusively or in connection with other tribes classed the Warli Language as Marathi.)

सन १९५८ साली प्रसिद्ध झालेल्या 'हिंदुस्थानचा वंशशास्त्रविषयक अभ्यास' या ग्रंथात श्री. लॅथम यांनी असे म्हटले आहे की, "वारली लोकांची नावे मराठी आहेत व ते मराठी भाषा बोलतात."

(Latham, in his "Ethnology of India" published in the year 1858 A.D. observes. "The Warlis have Marathi names and speak Marathi Language.")

१८२२ साली प्रसिद्ध झालेल्या बॉंबे गॅझेटिअरमध्ये पुढील उल्लेख आढळतो. "वारली लोकांची भाषा कुणबी लोकांच्या भाषेसारखीच आहे. ते नेहमी मराठी भाषा बोलतात; फक्त उत्तरेकडेच वारली लोक तेवढे गुजराती भाषा बोलतात."

(The Bombay Gazetteer (Thana) dated 1822 states ""The speech of the Warlis differ little from that of the kunbis, they always speak Marathi, except those in the extreme north who speak Gujarathi.")

सर जॉर्ज ग्रिअर्सन यांनी संपादित केलेल्या 'भारताची भाषिक पहाणी' या ग्रंथात म्हटले आहे की "वारली लोकांची पूर्वीची बोली इतर भिल्ल व खानदेशी बोलीसारखीच असली पाहिजे. कालांतराने त्या बोलीवर मराठीचा इतका परिणाम झाला आहे की ती बोली म्हणजे ठाण्याचा अंतिम उत्तर भाग सोडून, मराठीचीच पोटभाषा म्हणावी लागेल. अंतिम उत्तरेकडे मात्र ती गुजरातीची पोटभाषा आहे.

(Dr. Grierson in his "Linguistie survey of India' writer, "The Warlis of Thana are also bhils & their language must orginally have been of the same kind as other Bhil dialects and influenced by Marathi that it must now be classed as a dialect of that language, except in the extreme north where it is stated to be a form of Gujarati."

नात्याचे शब्द

मराठीत नाते	वारली शब्द
वडिलांचे वडील	आजोस
आईचे वडील	आजोस
मोठा भाऊ	मटा भास

मराठीत नाते	वारली शब्द
लहान भाऊ	लाहना भास
वडिलांचा मोठा भाऊ	मटे बापू
वडिलांचा लहान भाऊ	काकास
आई	आस
सावत्र आई	आस
मुलगा	पोयरा
मुलाचा मुलगा	पोयऱ्याचा पोयरा
मुलगी	पोयरी
मुलाची मुलगी	पोयऱ्याची पोयरी
मुलीची मुलगी	पोयरीची पोयरी
बापाची आई	आजिस
आईची आई	आजिस
नवरा	नवरा, गोहो, घरवाला
बायको	बायलस, आऊ
मुलाची बायको	सुनस, हुस्
वडील भावाची बायको	ओहनीस्
लहान भावाची बायको	ओव्हस, ओह्नी
वडिलांच्या वडील भावाची बायको	मटी आस
वडिलांच्या लहान भावाची बायको	काकिस (कोकणी)
बायकोचा पिता	सासरा
नवऱ्याचा पिता	सासरा
बायकोची आई	सासुस
नवऱ्याची आई	सासुस
मुलीचा नवरा	जव्हास, घरोर, घरतन्या, किंवा खंडाड

मराठीत नाते	वारली शब्द
वडील बहिण	बहिनिस
लहान बहिण	बहिनिस
नवऱ्याची बहीण	ओन्हीस, वन्सा किंवा नंधस्
नवऱ्याच्या बहिणीचा नवरा	मेह्नो
बहिणीचा नवरा	मेहनो
बायकोचा भाऊ	मेहेनो
बायकोची बहिण	सालीस
बायकोच्या बहिणीचा नवरा	साडू
वडिलांची बहिण	फुइ
वडिलांच्या बहिणीचा नवरा	मामुस
आईची बहिण	धाकली
आईच्या बहिणीचा नवरा	धाकल बापू
नवऱ्याचा वडील भाऊ	जेठुस
नवऱ्याच्या वडील भावाची बायको	वन्सा
नवऱ्याचा लहान भाऊ	देरूस (देवृ)
नवऱ्याच्या लहान भावाची बायको	वन्सा
दूरचा जावई	जवायसा
भावाचे मूल	भासचा पोर
बहिणीचे मूल	भाचरू

मद्रासी नावे जशी 'न्' ने संपतात उदा. चंद्रशेखरन्, रामनुजन् त्याप्रमाणे वारली नावे 'स्' ने संपताना दिसतात.

झालीस्, फुई, जेठस् ही गुजरातीला जवळची नावे आहेत. बाकीची सर्व दक्षिणेकडच्या मराठी नावाला मिळती आहेत.

'खंडाडिया' हे गुजरातीत सासुरवाडीला राहणाऱ्या जावयाच्या बाबतीत वापरतात. पण घरवाला, घरोर, जव्हास ही मराठीला जवळची आहेत.

'जातेला' गुजरातीत ज्याला पटेल म्हणतात किंवा मराठीत ज्याला पाटील म्हणतात त्याला वारली लोक जातेला म्हणतात.

तीन किंवा चार खेड्यात तो मुख्य मनुष्य म्हणून समजला जातो.

हा जातेला निकाल देण्याचे काम करतो व ते करिताना गावली हे नाव असलेली गोष्ट गद्यात म्हणतो. महादेव आणि गंगा-गौरीची गोष्ट तो सांगतो.

वारली देवांची नावे

हिंदूंचे राम, लक्ष्मण, हनुमान व शिव या देवांची नावे वारल्यात दिसतात. शंकराला ते 'ईसर' असेंच म्हणतात. राम व लक्ष्मण हे देव पुष्कळदा सूर्य अणि चंद्र यांचीच प्रतिबिंबे मानली जातात.

पावशा देव म्हणजे पर्जन्य, पावस याला ते परमेसर म्हणतात व त्याला मृत्यु नाही अशी त्यांची कल्पना आहे.

धरतरी - म्हणजे भूदेवता, गावत्री म्हणजे गाय, कनसरी म्हणजे धान्य याहि देवता आहेत.

वाघोबा, वाघ्या किंवा वाघया म्हणजे व्याघ्रदेव. आश्विन द्वादशीला वारली लोक वाघयाची पूजा करतात व त्या दिवसाला ते वाघबारस म्हणतात.

बेल, पिपल व उंबर ही झाडे पवित्र मानली जातात. बरम्भा ही देवता त्या झाडांत राहते. अशी वारली लोकांची समजूत आहे. तुलस ही सुद्धा ते पवित्र मानतात.

वारली लोकांच्या [illegible] देवता [illegible]जे नारन दे[illegible] आ[illegible] हिमाई [illegible] होत.

सर्वात नारन देव हा मुख्य समजला जातो व प्रत्येक कुटुंबात त्याची दगडी मूर्ती असते.

नारन देवाचं गाणं वारली लोकांत विशेष महत्त्वाचं आहे.

''कानु मातेच्या दारी भरला दरबार
पन नारन देव कर कारभार
कनसरीच्या दारी भरला दरबार
पन नारन देव कर कारभार
तपेसऱ्याच्या दारी भरला दरबार
पन नारन देव कर कारभार''

अशा तऱ्हेनें प्रत्येक देवाचा दरबार भरला तरी त्यांत नारन देवच खरा मुख्य असें त्यांना सुचवावयाचे असतें. यात यादीत महादेव, सुरेनारायन, चांद सूर्य, इंद्र, गोकुल, नौकुल, (नकुल), शाहिदेव, (सहदेव) आणि भिंवाबल्या (भीम) यांचीही नावे त्या पद्यात आहेत.

हिरवा देव हा वारल्यांच्या घरांत एका टोपलीतं ठेवलेला असतो. त्या टोपलीत तांदूळ असतात व दरवर्षी नव्या तांदुळांनी ती टोपली अर्धी भरतात. त्याच टोपलींत चार सुपाऱ्या असतात. त्या हिरव्याच्या नारी म्हणजे बायका समजल्या जातात. दुसऱ्या एका टोपलीत तीन सुपाऱ्या असतात. त्याही त्याच्या नारीच होत पण त्यांना तांबडे लावलेले नसते व त्यांना कोऱ्या म्हणजे शुद्ध असें मानले जातें

त्या सात नारींची नावे : खोडाय-वेडाय, हरनाय-कोपराय, छापाय-मोग्राय, फुलाय-झेलाय, सेंदराय-कुकवाय, सेसाय-वेसाय आणि गुनाय-पदमाय

'हिमाय' आणि 'हिरोबा'

हिमाय किंवा हेमाय ही स्त्री जातीसाठी पूजण्यास योग्य अशी देवता समजली जाते. ही हिरवा देवाची बहीण अशी त्यांची कल्पना आहे.

वारली लोकांची देवता जी 'हिमाय' म्हणून आहे तिचा अर्थ संस्कृतमधील 'अम्ब' शब्दाप्रमाणें आइ असा आहे.

द्रविडियन् भाषेतील 'अम्मा' या शब्दाशीं त्यांचे साधर्म्य आहे. वारली लोकांच्या नारी देवता ज्या आहेत त्यांत 'आय्' असा शेवट आहे. 'सेंदराय' 'कुळवाय' 'फुलाय' इत्यादी तसेच वारली लोकांचे जे पुरूषदेव आहेत त्यांच्या शेवटीं 'बा' असतो. जसें हिरोबा, वाघोबा. त्याचाहि उगम द्राविडी भाषेंतील 'अप्पा' या शब्दांप्रमाणे त्यां भाषेतून झाला असण्याचा संभव आहे.

पिशाच्च देवता असें ज्यांना म्हणता येईल अशा देवता वारली लोकांत आहेत त्यांची नावे.

१. बरम्भा, २. सनवरी, ३. गिऱ्हा, ४. छेडा, ५. हेड्ली, ६. किसकात्या, ७. भंडारी, ८. हेकड, ९. रानभूत.

सण व धार्मिक दिवस

१. शिमगा, २. दिवाली, ३. वाघबारस, ४ चौथ (भाद्रपद महिन्यांतील दुसऱ्या पंधरवड्यांतील चौथा दिवस)

या दिवसांना वारली लोक ''सनाचा दिस'' असें म्हणतात.

(जर मूल नवसाने झाले असेल तर त्याला 'नवशा' असे ते म्हणतात; जर आईने भिक्षा मागण्याचा नवस केला असेल तर त्या मुलाला भिकल्या व मुलीला भिकली असे ते म्हणतात.)

माघाच्या पहिल्या पंधरवड्यातील दुसऱ्या दिवसाला ते माहीबीज असे म्हणतात. वैशाखाच्या पहिल्या पंधरवड्यांतील तिसऱ्या दिवसाला ते आखातीज असे म्हणतात.

वारली शब्द	अर्थ
बोल	वाङनिश्चय
सुवासिनी	सौभाग्यवती स्त्री
दारचे पाव्हने	लांबचे नातेवाईक
फरी	धान्याचे एक माप
कारभारी	लग्न ठरविणारा मध्यस्थ
देज	हुंडा
पिल्ही	तांदळाचे पीठ, नारळाचा रस यांचे मिश्रण
मुंडावली	नवऱ्या मुलाच्या कपाळावर बांधलेली फुलांची माळ
धान कांडने	तांदळावरील टरफले काढणे
मोसाला किंवा मामा शेळा	मामाने दिलेली देणगी

धान कांडणे हा लग्नांतील विधी चालला असतांना नवरी नवऱ्याला म्हणते

''तू जा दारू पिया''

व नवरा नवरीला म्हणतो

''तू जा बांगड्या भराय''

धार्मिक विधी

वारल्यांचे जे धार्मिक विधी आहेत ते सर्व वारली लोक भाविकपणाने करतात.

त्यांच्या धार्मिक विधीचे मुख्यत: दोन प्रकार आहेत एक प्रकार म्हणजे ज्यात लोकगीतांना फार प्राधान्य असते असे; दुसरा प्रकार म्हणजे ज्यात गीतांना किंमत नाही असे. पहिल्या प्रकारात विवाह, उत्तरक्रिया व शेतकीविषयक विधी येतात व दुसऱ्यांत जन्मसंबंधी व दैवतांना आवाहन करण्याचे विधी येतात.

लग्नप्रसंगासारख्या समारंभाच्या वेळी बायका जी गाणी म्हणतात त्यांचा संबंध त्यावेळी केल्या जाणाऱ्या संस्कार विधीशी असतो. म्हणून ती गाणी म्हणजे त्या संस्कारांचा एक भागच आहे असे दिसते.

या गाण्यांवर हिंदू धर्म व त्यांची पुराणे यांची छाया पडलेली आहे व ही गाणी अर्थातच फार थोडी आहेत.

या गाण्यांत कंटाळा उत्पन्न करण्याइतकी पुनरावृत्ती होत असते तसेच शेवटचे अक्षर क्वचित उच्चारासाठी दीर्घ उच्चारले जाते तर वृत्तासाठी काही मधली अक्षरे ऱ्हस्वही म्हटली जातात.

सुरंग देव, तपेसर देव, भोगेसर देव

पोयनार - कमळाचे रोप

पायली - चार शेर

खपेसर - श्रमणांचा देव (खपणें - श्रमणें)

खांबेसर - खांबाचा देव

उबद्देसर - पोटावर पडून राहणारा (उपडा)

मांडेसर - मांड्यांचा देव

स्त्री-पुरूषांची नावे

पुरूषांची नावे : आन्या, भिकाऱ्या, भिरवल्या, बहरू (बहिरा), बल्या, बारकू, बारिकल्या (सडपातळ), भाद्या, भिवा, चैत्या (चैत्रात जन्मलेला), चंद्रु, देव्या, देवू, देवजी, धर्मा, धाकट, (लहान), धवलु (शुभ्र) दुंड्या (लठ्ठ), गंग्या, हवसा (हौशी), जेठ्या (जेष्ठ महिन्यांत जन्मलेला), जान्यौ, जावल्या (जुळा) काकड्या, काट्या, खर्जा, काल्या (काळा) कमल्या, लाहनु, लाडक्या, लखू, मंग्या (मंगळवारी जन्मलेला), मऱ्या किंवा मरल्या (अत्यंत दुर्बळ) महाद्या, मानजी, मुगाजी (मुका), पोसल्या, पोशा, पातल्या, रामा, रघु, राजू, रावजी, राडक्या, रूपजी, रेवड्या, सुकऱ्या (शुक्रवारी जन्मलेला) सुकड (केवळ हाडेच असलेला), वल्या, विकल्या, झेप्ऱ्या

स्त्रियांची नावे : आनी, बारकी, भिमी, भिरवली, चैतु, देवु, जमनी, जानु, जिवी, काशी, काकड, कालगी (काळी), लखमी, मंगू (मंगळवारी जन्मलेली), नवशी, रामी, राजू, राधी, रसू, रूपाई, रसमाई, सोमी, (सोमवारी जन्मलेली) सुकरी (शुक्रवारी जन्मलेली) शिनवारी, सोनी, सोवारी, तुलशी, वन्शी, (वनस्पतीमुळे वाढलेली), झिप्री (झिपऱ्या केसांची)

या नावांवरून असे दिसते की वारली लोकांची नावे क्वचित शारीरिक वैशिष्ट्यावरून ठेवली आहेत; उदाहरणार्थ रडक्या, धाकला, झिपरी इत्यादि.

याचा अर्थ रडका, धाकला व झिपरा हे शब्द त्यांच्या शब्दसंपत्तीत प्रथमपासून असावे व ज्या अर्थी हे शब्द मराठीला अत्यंत जवळचे आहेत त्याअर्थी त्यांची भाषाही मराठीलाच जवळची आहे.

काही नावे हिंदु लोकांत रूढ असलेल्या नावाचे अपभ्रंश दिसतात; उदाहरणार्थ गंग्या, लखमी इत्यादी. याचा अर्थ हिंदू लोकांशी सहवास आल्यानंतर त्यांची काही नावे त्यांनी स्विकारली असली पाहिजेत.

'सुवासिनी' हा शब्द वारली लोकांत रूढ आहे. व पुष्कळसे संस्कृत शब्द त्यांच्या भाषेत या शब्दासारखे आहेत.

'घरोर' म्हणजे जो जावई सासऱ्याच्या घरीं राहतो त्याला घरोर असे म्हणतात. यावरून घर हा शब्द त्यांच्यात पहिल्यापासून रूढ असावा असे दिसते.

'शिंदी' चे झाड; ज्यापासून अमली पदार्थ मिळतो ते 'हेडली' मृत्युनंतर जी बाई पिशाच्च होते तिला हेडली असे म्हणतात.

प्रेतयात्रेबरोबर स्त्रियाही जातात व ज्या ठिकाणापासून त्या परत फिरतात त्या ठिकाणाला 'विसावा' असे म्हणतात.

'चवली' व 'अल्' हे शब्द पूर्णपणे वारली लोकांचे दिसतात.

'दातुन' दांत स्वच्छ करण्याकरिता एका विशिष्ट झाडाच्या बारिक काटक्या उपयोगात आणतात त्याला दातुन म्हणतात. (दातण) हा गुजराती भाषेत अत्यंत रूढ शब्द आहे.

एखादा मनुष्य मृत पावल्यानंतर त्याच्या नातेवाईकांना भगत विचारतो

''येचा भार देवला काय् ?''

''माश्याचा भार देवला काय ?''

''हाताचा भार देवला काय ?''

मृत माणसाचे दिवस करणाऱ्या उपाध्यायाला 'कामडी' असे म्हणतात.

काही म्हणी

'मेला तो गेला' असे वारली बोलतात म्हणजे जो मेला तो कायमचा गेला.

मनुष्याच्या शरिरात जो प्राण असतो त्याला वारली लोक 'जीव' किंवा 'वारा' असे म्हणतात व जेव्हा तो मरतो तेव्हा हा 'वारा' 'परमेसर' जो आहे त्याच्याकडे जातो.

''जिवाला मरन नाही, काय कोमते'' याचा अर्थ आत्म्याला किंवा वाऱ्याला मरण नाही; फक्त शरीर (काया) कोमजते असा आहे.

''परमेसर देता न तोच नेता'' परमेश्वरच जीव देतो व तोच नेतो.

बाल जिनल्याचा फल नाही; उजवन्याचा फल आहे. मुलाला केवळ जन्म देऊन उपयोग नाहीं; त्यांचे लग्न केले पाहिजे.

''कना बगर धन नाहीं'' - धान्याशिवाय संपत्ति नाहीं.

''देवाचा देखना न मानजाचा चाखना'' - देव फक्त पाहातात, पण मनुष्य चाखतात.

'परनवेला त मरणवेला' - ज्या अर्थी तुम्ही हे लग्न केले आहे, त्याअर्थी मृत्यु येईपर्यंत हे नाते राहिले पाहिजे.

''अम्बा पडेल त चीच धरेल, न चीच पडेल त अम्बा धरेल'' चिंच पडली तर आंबा सावरील व आंबा पडला तर चिंच सावरील

''पांच गांवचा राजा आला विडा खावुन हिंडे पडला, सीता? जिकला न यो चालला'' लग्नाच्या वेळीं वऱ्हाडक्या वरील म्हणतो.

वारली भाषेबद्दल डॉ. ग्रिअर्सन लिहितात -

''मुंबई इलाख्यातील सर्व बंदरपट्टीच्या भागामध्ये उत्तरेकडच्या दमणापासून दक्षिणेकडच्या राजापूरपर्यंत मराठी हीच मुख्य भाषा आहे. उत्तरेकडील दमणपासून उंबरगावपर्यंतच्या भागावर मराठी आणि गुजराती भाषांचा प्रभाव दिसतो. या भागामध्ये बोलीभाषेवर जरी गुजराती भाषेची छाप असली तरी ती थोड्याच प्रमाणात आहे.''

''याच प्रकारची अन्य बोलीभाषा म्हणजे वारली. वारली लोकांचे कातकऱ्याप्रमाणेच भिल्ल लोकांशी (कोळीपेक्षा) जास्त साधर्म्य आहे. परंतु त्यांच्या भाषेवर मराठी भाषेचा जास्त पगडा आहे.''

"Marathi is the prinicipal language of all the coast districts of the Bombay Presidency, from Daman in the north to Rajapur in the south. The northern part of this territory from Daman to Umbargam is divided between Marathi and Gujarati and the influence of the latter language is also felt farther south, the vocabulary to some extent being Gujarati. This element is not, however strong."

"Another dialect of a similar kind (i.e. broken) is Warli. The Warlis, as also the katkaris, are said to be more like the Bhils than the Kolis. Their dialect is still more influenced by Marathi than Katkari."

वारली शब्द

मराठी	वारली
मी	मयू किंवा मी
आम्ही	हामी
तू	तु
तुम्ही	तुमी
तो	तो
ती	ती
ते	ते
हात	हात
नाक	नाक
तोंड	तोंड
डोके	मुख, डोकां, माथां
छाती	सांथी
सोने	सोनां
मनुष्य	माणुस, गोहो
बाल	पोयरां
चाकर	चाकर, किंवा हाळी
देव	देव, परमेसर
सूर्य	सूरया
चांदणी	चांदणी
आग	आग
गाय	गायं, गावतरी, (गावली)
घोडा	घोडा, पुनवा
लोखंड	लोखड

प्रत्यय लावून झालेले शब्द

मराठी	वारली
माझा	मांझा
आमचा	हामचा
तुझा	तुझा
तुमचा	तुमचा
त्याचा	तेचा
तिचा	तेचा
त्यांचा	त्येंचा
पायाचा	पायाचा

इतर काही शब्द

मराठी	वारली
दात	दात
ओठ	होंट
गळा	गला
चांदी, रूपें	रूपां
तांबे	तांबां
बायको	बाइल, आऊ
मुलगा	पोयरां
शेतकरी	कुळंबी
भूत	भूत
चंद्र	चांद
आकाश	आब्
पाणी	पानी
झाड	झाड
बैल	बैल
कुत्रा	कुतरा, सुना
मांजर	मांजर
उंट	उट
जा	जा

मराठी	वारली
बैस	बस
मार	मार,कुट
मर	मर
धाव	पल
वर	वर,वरतड
जवळ	रांगऽ
पूर्वी	पहलऽ, मोहरऽ
कोण	कोन
कां	क्या
आणि	न
जर	ज,जो
होय	हो, ह, हां
कोंबडा	कोंबडा
पक्षी	पाखरू
खाणें	'खा'
पहा	नांग
दूर	दूर
काय	काय
केव्हां	कई
अरेरे	अरे, अर, अरा
नाही	नाहीं, निही
दे	दे, ओप् (दावर)
खालीं	खालतऽ
उठ	उठ
पाठीमागें	मघारी
बापाचा	बापासचा, बाचा
बापापासून	बापापायशी
बापाला	बापासूला, बाला
बापानें	बापून्, बान्

मराठी	वारली	
वाईट माणूस	भुंडा किंवा व्याट माणूस	
चांगला माणूस	बेस माणूस	
उंच माणुस	उचा माणुस	
पाशी	पाय	
विचारले	विचार	
करतोस	करस	
खायाला	खाया	
जाऊन	जान	
जाईन	जान	
केवढे	कोड	
बापाला	बासूल	
तेथे	तय	ए बद्दल अ
भिंत	भित	न् चा लोप
चिंच	चि	,,
उंट	उट	,,
पंख	पाख	,,
निघून	निंघून	न् 'अधिक'
उगवणे	उंगवने	,,
माझा	मांझा	,,
मग	मंग	,,
अजून	आझून	,,
आंबा	आंबो	'ओ' 'आ' याबद्दल
घोडा	घोडो	,,
पैसा	पैसो	,,

व यांची अनेक वचने पुढीलप्रमाणे

मराठी	वारली	
आंबे	आंबा	ए बद्दल आ
घोडे	घोडा	,,
पैसे	पैसा	,,
केळें	केलां	एं बद्दल आं
सोनें	सोनां	,,
रूपें	रूपां	,,
कोंबडे	कोंबडा	,,
तांबें	तांबा	,,
चाकर	चाकरू	अ बद्दल उ
हाट	हाटु	,,

ज्ञानेश्वरींतील कांही कोकणी शब्द वारली भाषेत सांपडतात; उदाहरणार्थ

मेरा-मर्यादा, साट-बाजार, भातें - धान्य, सुनें - कुत्रें

कोंकणी	वारली
आइस्	आस्
बापुस्	बास्
भाऊस्	भास
बेहिस्	बहिनिस्

विभक्ति प्रत्यय

द्वितीया 'ल' प्रत्यय मराठीत 'ला' आहे. तृतीया 'आ' प्रत्यय घेते मराठीत 'नें' आहे.

उदाहरणार्थ :

रामाल - रामाला, मानसां - माणसानें

साधनार्थी तृतीयेचा प्रत्यय 'खाल' असा वारली भाषेत दिसतो.

'क्या खाल' म्हणजे कशानें चतुर्थी 'ल' मराठीत ला पंचमी शी किंवा पायशी उदाहरणार्थ बावित्शी षष्ठीचा प्रत्यय 'आंत' किंवा 'मा' (गुजराती) दिसतो. शिवाय वारली भाषेत (माझार) हा प्रत्यय काही ठिकाणी दिसतो. उदाहरणार्थ

''दुनिया माझार'' म्हणजे दुनियेत वारली भाषेत कृदन्त रूपें तयार करितांना फक्त 'स' हे व्यंजन कामे भागते; जसे

बोलस - बोलत, करस - करीत

आज्ञार्थ द्वि. पु. एकवचन तयार करितांना 'जो' हा प्रत्यय आणि अनेकवचनी रूप तयार करितांना 'जा' हा प्रत्यय जोडलेला दिसतो.

जसें धावजो - धांव, धावजा - धांवा

काही ठिकाणी 'य' चे 'ज' असें रूपांतर झालेलें दिसते.

यम - जम

युग - जुग

युग्म - जुग्म

भार्या - भारजाय

'ष्' याचा बद्दल 'ख्' या व्यंजनात झालेला दिसतो.

शेषनाग - शेखनाग

पुरूष - पुरूख

विष - विख

जोडव्यंजने तोडण्याकडे प्रवृत्ति दिसते.

उदाहरणार्थ

प्रजा - परजा

लग्न - लगिन

परमेश्वर - परमेसर

धरित्री - धरतरी

प्राण - पराण

वारली भाषेतील काही शब्द मराठीपेक्षा संस्कृतलाच जवळचे वाटतील असे आहेत.

उदाहरणार्थ

संस्कृत	**वारली**
युग्म	जुग्म
धरित्री	धरतरी
महि	मह्या
मनुज	मानजा
नागवल्ली	नागोली
सुरा	सुर
हिम	हिव
श्वन्	सुना
त्वरितम्	तुरत्
बहु	बहु
गायत्री	गावतरी
ज्वर	जरा
लोह	लोही

काही शब्द वारली भाषेचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येतील - त्यांची उदाहरणे

धडका - वस्त्र

नांगणें - पाहणे

वाळुख - काकडी

हु - सुद्धा

कय - केव्हा

लाहा - लवकर

वाडघा - वृद्ध मनुष्य

वहार - बोलाव

हारी - बरोबर

निका - खरोखर

मस - पुष्कळ

पुनवा - घोडा

पोयनार - कमळाचे रोप

औ - पत्नी, स्त्री

रांग - जवळ

निसुद - हिरवा

काळ

मराठी आणि वारली भाषेतील काळामधील फरक स्पष्ट व्हावा म्हणून उदाहरण गेऊन काळ चालवून दाखवले आहेत.

वर्तमान काळ

	मराठी	वारली
प्र. पु.	मी आहे	मी आहाय, अहाय
	तू आहेस	तू अहस
द्वि. पु.	तो आहे	तो आहे, आहय
	आम्ही आहो	हामी हाव
तृ. पु.	तुम्ही आहां	तुमी आहा
	ते आहेत	ते आहत

भूतकाळ

	मराठी	वारली
प्र. पु.	मी होतों	मी होता, किंवा होतु
	तूं होतास	तू होता
द्वि. पु.	तो होता	तो होता
	आम्ही होतो	हामी होते, हामी होतु
तृ. पु.	तुम्ही होता	तुमी होते
	ते होते	ते होते

मारणे हा 'धातु'

वर्तमानकाळ

	मराठी	वारली
प्र. पु.	मी मारतो	मी मारऽ
	आम्ही मारतों	हामी मारू
द्वि. पु.	तू मारतोस	तू मारस
	तुम्ही मारतां	तुमी मारा
तृ. पु.	तो मारतो	तो मारऽ
	ते मारतात	ते मारत

अपूर्ण वर्तमान काळ

	मराठी	वारली
प्र. पु.	मी मारीत आहे	मी मारत आहे
	आम्ही मारीत आहों	हामी मारत हाव
द्वि. पु.	तू मारीत आहेस	तू मारत आहस
	तुम्ही मारीत आहां	तुमी मारत आहा
तृ. पु.	तो मारीत आहे	तो मारत आहे/आहय
	ते मारीत आहेत	ते मारत आहत

पूर्ण वर्तमान काळ

	मराठी	वारली
प्र. पु.	मी मारले आहे	मय् मारेल आहे
	आम्ही मारले आहे	हामी मारेल आहे
द्वि. पु.	तूं मारले आहेस	तुहुं मारले आहे
	तुम्ही मारले आहे	तुमी मारेल आहे
तृ. पु.	त्यानें मारले आहे	तो मारेल आहे
	त्यांनी मारले आहे	त्याहां मारले आहे

भूतकाळ

	मराठी	वारली
प्र. पु.	मी मारलें	मिहिं मारला
	आम्ही मारले	हामी मारला
द्वि. पु.	तूं मारलेस	तुहुं मारला
	तुम्ही मारलें	तुम्ही मारला
तृ. पु.	त्यानें मारलें	त्याहां किंवा ते हां मारला
	त्यांनी मारलें	त्याहां मारला

अपूर्ण भूतकाळ

	मराठी	वारली
प्र. पु.	मी मारीत होतों	मी मारत होता
	आम्ही मारीत होतो	हामी मारत होते
द्वि. पु.	तूं मारीत होतास	तू मारत होता
	तुम्ही मारीत होता	तुमी मारत होते
तृ. पु.	तो मारीत होता	तो मारत होता
	ते मारीत होते	ते मारत होते

पूर्ण भूत काळ

	मराठी	वारली
प्र. पु.	मी मारले होते	मि किंवा मिहिं मारेल
	[illegible]	[illegible]मी मा[illegible]
द्वि. पु.	[illegible]रले होतेस	तुहु मा[illegible]
	तुम्ही मारले होते	तुमी मारेल
तृ. पु.	त्याने मारले होते	त्याहां किंवा तेहां मारेल
	त्यांनी मारले होते.	त्या हां मारेल

भविष्यकाळ

	मराठी	वारली
प्र. पु.	मी मारीन	मि मार[illegible]
	आम्ही मारूं	हामी मारू
द्वि. पु.	तू मारशील	तू मारसी
	तुम्ही माराल	तुमी माराल
तृ. पु.	तो मारील	तो मारल
	ते मारतील	ते मारथी

अपूर्ण भविष्यकाळ व पूर्ण भविष्यकाळ हे वारली लोकांच्या प्रचारांत विशेष दिसत नाहीत.

काही शब्दयोगी अव्यये :

मराठी	वारली
जवळ	रांग
वर	वर, वरत (आपल्याकडे मराठे लोकांत रूढ)
पूर्वी	पहल
खालीं	खालत
मागे	मागत
पासून	पायशी
पुढे	मोहर

कांही उभयान्वयी अव्ययें

आणि	न
जर	ज किंवा जो
परन्तु	पन
गिधास	घ्याल
अथ	येथे
तथ	तेथे
मेहनतु	मेहनती (उ' कार ज्ञानेश्वरीप्रमाणे)
तइं	त्या वेळेस
बहु	पुष्कळ (संस्कृत शब्द)

(फॉर्म ४, नियम ८ नुसार निवेदन)

१.	प्रकाशन स्थळ	:	६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.
२.	प्रकाशन काळ	:	त्रैमासिक
३.	मुद्रक, प्रकाशक व संपादक	:	रामचंद्र केशव मुटाटकर
	राष्ट्रीयत्व		भारतीय
	पत्ता	:	६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ७.
४.	स्वामित्व	:	महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११ ००७.

मी, रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

३१ जानेवारी १९९७

रा. के. मुटाटकर
- प्रकाशक

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी, नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

-वर्गणीदारांस सूचना-

ज्यांची वर्गणीची मुदत संपली आहे, त्यांनी पुढील वर्षासाठी वार्षिक वर्गणी रू. ५०/- फक्त त्वरित पाठवावी, ही विनंती.

- संपादक

श्रद्धांजली

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ख्यातनाम जीवसंख्या शास्त्रज्ञ व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे अध्यक्ष डॉ. पां. वा. सुखात्मे यांचे दिनांक २८ जानेवारी, १९९७ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या आकस्मात निधनाने आमच्यातील एक मार्गदर्शक व गोरगरिबांच्या सुखासाठी झटणारा शास्त्रज्ञ हरपला आहे. परिषद व हाकारा संपादक त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

- कार्यकारी मंडळ / संपादक

सूची

अंक पहिला : जानेवारी -मार्च	१९८० - जबरन जोत जंगल जमीन
अंक दुसरा : एप्रिल-जून	१९८० - आदिवासी व शिक्षण
अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर	१९८० - आदिवासी व वनसंवर्धन
अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर	१९८० - आदिवासी साहित्य व कला
अंक पाचवा : जानेवारी-मार्च	१९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती
अंक सहावा : एप्रिल-जून	१९८१ - आदिवासी व आरोग्य
अंक सातवा : जुलै-सप्टेंबर	१९८१ - रोजगार हमी योजना
अंक नववा : जानेवारी-मार्च	१९८१ - उत्ताराखंड अभ्यास मोहीम
अंक दहावा : एप्रिल-जून	१९८२ - धरणे व विकास
अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर	१९८२ - जंगल व्यवस्थापन
अंक तेरावा : जानेवारी-मार्च	१९८३ - आदिवासी व दारू
अंक चौदावा : एप्रिल-जून	१९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर	१९८३ - प्रा. सरदार गौरव अंक / आदिवासी साहित्य
अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर	१९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
अंक सतरा-आठरा : जानेवारी-जून	१९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर	१९८४ - आदिवासी स्त्री
अंक विसावा : ऑक्टोबर-डिसेंबर	१९८४ - आदिवासी आरोग्य व शिक्षण
अंक एकविसावा : जानेवारी-मार्च	१९८५ - आदिवासी संघटन
अंक बाविसावा : एप्रिल-जून	१९८५ - जमीन हस्तांतर
अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर	१९८५ - आदिवासी महिला
अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर	१९८५ - आदिवासी व सरकार
अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च	१९८६ - जंगल व धरण
अंक सव्विसावा : एप्रिल-जून	१९८६ - आदिवासी कला
अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर	१९८६ - आदिवासी व वेठबिगारी
अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर	१९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च	१९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
अंक तिसावा : एप्रिल-जून	१९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर	१९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
अंक तेहतीस : जानेवारी-मार्च	१९८८ - सवलती अपहरणाची समस्या
अंक चौतीस : एप्रिल-जून	१९८८ - आदिवासी साहित्य
अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर	१९८८ - आदिवासी समाज व संस्कृती
अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून	१९८९ - डॉ. वेरीअर एलवीन विशेषांक
अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर	१९८९ - व्यवसाय मार्गदर्शन
अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून	१९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर	१९९० - जागतिक आदिवासी
अंक चव्वेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर	१९९० - गं. बा. सरदार स्मृति विशेषांक
अंक पंचेचाळीस-सेहेचाळीस : जानेवारी-जून	१९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर	१९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर	१९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती
अंक एकोणपन्नास-पन्नास : जानेवारी-जून	१९९२ - सर्वसाधारण आदिवासी
अंक एक्कावन-बावन : जुलै-डिसेंबर	१९९२ - अनुताई वाघ विशेषांक
अंक त्रेपन-चोपन्न : जानेवारी-जून	१९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव
अंक पंचावन-छप्पन : जुलै-डिसेंबर	१९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन
अंक सत्तावन : जानेवारी-मार्च	१९९४ - सर्वसाधारण आदिवासी
अंक अठ्ठावन्न : एप्रिल-जून	१९९४ - आदिवासी एकता परिषद
अंक एकोणसाठ : जुलै-सप्टेंबर	१९९४ - आदिवासी विकासाची सैद्धान्तिक भूमिका
अंक साठ : ऑक्टोबर - डिसेंबर	१९९४ - आदिवासी जमाती
अंक एकसष्ठ - बासष्ठ : जानेवारी - जून	१९९५ - राणीपूर विशेषांक
अंक त्रेसष्ठ : जुलै-सप्टेंबर	१९९५ - कुपोषण विशेषांक
अंक चौसष्ठ : ऑक्टोबर - डिसेंबर	१९९५ - पर्यावरण विशेषांक
अंक पासष्ठ : जानेवारी - मार्च	१९९६ - आदिवासी जमाती
अंक सहासष्ठ : एप्रिल - जून	१९९६ - महाराष्ट्र, ओरिसा अभ्यास दौरा
अंक सदुसष्ठ : जुलै - सप्टेंबर	१९९६ - आदिवासी जमाती

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्र यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरुप म्हणून 'हाकारा' त्रैमासिक सुरु करण्यात आले आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारुन आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथवा मनी ऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

पत्रव्यवहाराचा पत्ता :

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.

Printed by Jnana Prabodhini Mudran Vibhag, Pune - 30.